म. ग्रं. सं. ठाणें

विषय

ग्रंथालय क्रमांक

लेखक विनायक कोंडदेव ओक

सन १८८३

पुस्तकाचें नांव सामुअल जॉन्सन

५८६

२४

चरित्र

ह २० व

सं. नं. ३५४

श्री ग्रंथ संग्रहालय
संग्रह नं. ३६९
ता. २०/९/२९३
ठा. जो.

लेखक :
विनायक कोंडदेव ओक
सन १८८३

# साम्युअल जान्सन.

## भाग पहिला.

हा महाविद्वान्, महानीतिमान्, आणि समयोचित भाषण करणारा, उत्तम ग्रंथकर्त्ता, इंग्लंददेशामध्यें स्ताफोर्डशायर प्रांतांत लिचफील्ड येथें, इ० स० १७०९ च्या सप्तंबर महिन्याच्या १८ व्या तारखेस जन्मला. तो आठ नऊ वर्षांचा असतां, एके दिवशीं त्याच्या आईनें त्यास प्रार्थनापुस्तकांतले चार श्लोक पाठ करावयास बसविलें, आणि ते पाठ होतपर्यंत जागेवरून उठूं नको ह्मणून सांगितलें. ती दुसऱ्या मजल्यावर पोहोंचली नाहीं तोंच, हा तिच्या पाठीमागें आला. तेव्हां, तिनें त्यास विचारिलें, “कांरे साम, वर कां आलास.?” त्यानें उत्तर दिलें, “आई, झाल्या त्या कविता मला पाठ.” आणि त्यानें त्या लागल्याच घडाघड ह्मणून दाखविल्या! फार तर ह्या कविता त्यानें एकदोनदां वाचल्या मात्र असतील.!!

जान्सन हा आपल्या वयाच्या दाहव्या वर्षी लातिन भाषा शिकूं लागला. ह्या विषयाचा त्याचा मुख्य गुरु हंतर ह्या नांवाचा गृहस्थ होता. त्याविषयीं प्रौढ वयांत जान्सन असें ह्मणत असे कीं, “तो फार कडक होता; त्याच्या कडकपणाला कांहीं योग्य कारण लागत नव्हतें; तो आह्मांला निर्दयपणानें मारीत सुटे; आळस आणि अज्ञान ह्यांचे मधला भेद त्याला कधींही कळला नाहीं; ह्मणजे,

असें; शिकविलेली गोष्ट मुलानें आळसानें लक्षांत ठेविली नाहीं, ह्मणून तो जशी त्यास शिक्षा करी, तशी, न सांगितलेल्या गोष्टीचें उत्तर जर त्याजकडून न आलें, तर करी. मुलाला प्रश्न विचारावा; त्यानें बरोबर उत्तर दिलें तर बरें; नाहीं तर त्याला बेलाशक झोडून काढावें; मग तो विषय त्याला कधीं शिकविलेला असो अगर नसो; अशी त्याची रीति असे. त्यानें मध्येंच एका मुलास बोलावून आणून समईला लातिन शब्द काय ह्मणून विचारावें; आणि तो त्याला आला नाहीं ह्मणजे त्याला मारावें. अहो, विचारल्या प्रश्नाचें उत्तर जर मुलास देतां येत असलें, तर मग त्याला शिक्षक पाहिजे कशाला.?"

तथापि, जान्सन हा हंतर साहेबाचे फार आभार मानीत असे. त्याचा मित्र लांगतन ह्यानें त्यास एकदां असें विचारिलें कीं, "तुह्मांस लातिन भाषेचें इतकें मार्मिक ज्ञान कसें प्राप्त झालें.?" त्यावर जान्सनानें उत्तर केलें कीं, "माझ्या गुरूनें मला खूब चाबकाखालीं घेतलें, ह्मणूनच मला इतकें कळूं लागलें; नाहीं तर कांहीं एक झालें नसतें. आह्मांस शिक्षा करीत असतां तो आह्मांस ह्मणे कीं, मुलांनो तुह्मांस फांशीं जाण्याचा प्रसंग येऊं नये ह्मणून मी हें शासन तुह्मांस करितों." छडीनें शिक्षा करून शिकविण्याची रीति जान्सन ह्यास फार पसंत वाटे. तो हमेषा असें ह्मणे कीं, "तूं अमुक अमुक कर ह्मणजे तुझ्या भावांबहिणींपेक्षां लोक तुझी फार वाहवा करितील, असें मुलास सांगण्यापेक्षां, तूं अमुक अमुक न करिशील तर तुला छड्या देईन, असें सांगावें हें बरें. छडी मारीन ह्मटलें ह्मणजे मुलगा आपला धडा करितो, आणि तेव्हांच त्या शिक्षेचा परिणाम संपतो;

त्यापासून पुढें दुसरा कांहीं वाईट परिणाम होत नाहीं. परंतु, ईर्षा उत्पन्न करणें हा एका मोठ्या दुर्गुणाचा पाया होय; ह्मणजे, त्याच्या योगानें बहीणभावंडें एकमेकांचा द्वेष करूं लागतात." संप्रतकाळच्या विद्वान् लोकांचें मत ह्याच्या अगदीं उलट आहे.

हेक्टर ह्मणून जान्सनाचा एक शाळासोबती होता. तो असें सांगत असे कीं, "शाळेंत जान्सनाला जी शिक्षा होत असे, ती बोलण्यावरून अथवा दुसऱ्या मुलांस खेळविल्यावरून मात्र होत असे. जान्सन हा स्वभावानें आळशी आणि मोठा चालढकल करणारा असे. तरी तो एकदा मेहनत करावयास बसला ह्मणजे तो आपलें सर्व काम संपवून टाकी. त्याजबरोबर मेहनत करण्यास कोणी टिकत नसे."

मनुष्याचे गुणावगुण बालपणांतच दिसून येतात, असें जें ह्मणतात, तें खरें आहे. जान्सनानें प्रौढ वयामध्यें जसें सर्व लोकांस आपले बुद्धिमहत्त्वानें थक्क केलें होतें, तसें बालपणांत ही त्यानें सर्व मुलांत आपलें श्रेष्ठत्व ठेविलें होतें. शाळेंतले नेमलेले धडे तयार करण्याचे कामीं तो आपल्या वर्गबंधूंस फार उपयोगीं पडत असे. तेणेंकरून ते त्याला अतिशयित भजत. त्याला आपल्या डोक्यांवर घेऊन तें शाळेंत नेत, आणि घरीं आणून पोहोंचवीत.! जान्सनाच्या लहानपणींच्या उत्तम बुद्धीची ही सर्वोत्कृष्ट साक्ष होय. अशा बुद्धीचे पुरुष हीं मानवजातीचीं बहुमोल भूषणें होत. आपल्या शाळेंतल्या दिवसांविषयीं बोलत असतां, तो, आपला मित्र बास्वेल ह्यास असें ह्मणाला कीं, "मी अमक्याचे इतका चांगला आहें, असें ह्मणून माझ्या,

सोबत्यांनीं माझी कधीं स्तुति केली नाहीं; जान्सन अमक्या इतका हुशार आहे, असें त्यांनीं कधीं ह्मटलें" नाहीं; तर, अमुक गृहस्थ जान्सनाइतका विद्वान आहे, असें त्यांनीं नित्य ह्मणावें."

जान्सनाला लहानपणापासूनच एका रोगाची व्यथा असे. त्याची पाळी आली ह्मणजे तो अगदीं तळमळत पडे. तेव्हां तो कधीं कधीं वेड्यासारखें करी. तरी त्यानें आपला विद्याभ्यास सोडिला नाहीं. तो आक्सफोर्डच्या पाठशाळेंत गेला, तेथें त्याच्या हुशारीविषयीं मोठी ख्याति झाली.

तरुणपणांतच त्याचे मनावर धर्मभक्तीचा ठसा चांगला उठला होता असें दिसतें. इ० स० १७३६ च्या सप्तंबर महिन्याच्या ७ व्या तारखेस त्यानें स्वहस्तें एके ठिकाणीं असें लिहून ठेविलें आहे.—"आज मला अठ्ठाविसावें वर्ष लागलें. हे परमेश्वरा, हें वर्ष मीं असें घालवावें कीं, तेणेंकरून मला अंतकालीं आणि न्यायाचे दिवशीं सुख प्राप्त व्हावें.! ही विनंती प्रभु येशू ख्रिस्ताच्या नांवानें मी तुला करितों. आमेन." हे भक्तीचे उद्गार तरुण मनुष्याच्या अंतःकरणास खरोखर भूषणप्रद होत. सांप्रतकाळीं आमच्या देशांत जें विद्वानमंडळ तयार होत आहे, त्यांनीं ह्याविषयीं चांगला विचार करावा.

आक्सफोर्ड येथें त्याचा विद्याभ्यास चालविण्याचें सामर्थ्य जान्सनाच्या बापास नाहींसें झालें. तेव्हां तो, इ०स० १७३१ त आपले गांवीं परत आला. त्याच वर्षाच्या दिसेंबर महिन्यांत तो मरण पावला.

पुढें सगळा संसार जान्सनाच्या आंगावर पडला. तेव्हां

त्यानें लीस्तरशायर प्रांतांत एक शिक्षकाची जागा पतकरिली. तेथें फार काम करावें लागे, तेणेंकरून त्याला अतिशयित त्रास झाला. ह्मणून त्यानें ती सोडिली. आणि तो बर्मिंघाम येथें, आपला मित्र हेक्तर ह्याजकडे राहावयास गेला. तेथें, आपल्या मित्राच्या आग्रहावरून त्यानें एक लहानसें पुस्तक लिहिलें. त्यावद्दल त्याला सगळे चाळीस पन्नास रुपये मिळाले.!

जान्सन हा लहानपणापासून मोठा रसिक असे. आणि त्याला शृंगार फार आवडे. तरी, तारूण्याच्या भरांत असतांही त्याचे हातून अकर्म घडलें नाहीं, असें त्याचा मित्र हेक्तर हा खातरीनें सांगतो. तो ह्मणतो "कीं, जान्सन ह्यास दारू पिण्याचा भारी नाद होता; तरी, तो ह्मणजे अतिशयित दारू पिऊन एकाएकीं कधीं बेसावध झाला आहे, असें घडलें नाहीं. नाहीं ह्मणायास असें एकदा मात्र घडलें होतें."

जान्सन असा नेमस्त होता खरा; परंतु पोर्तर साहेब मेल्यावर त्याच्या विधवेविषयीं त्यास कामवासना उत्पन्न झाली. तिशीं मी एकदा लग्न केव्हां लावीन, असें त्याला होऊन गेलें. ध्यानीं मनीं स्वप्नीं त्याला ती दिसूं लागली. तिच्या स्तुतीखेरीज त्याच्या तोंडांतून शब्द निघेना. तीही ह्यास अनुकूल झाली. पुढें, आपल्या मातुश्रीची आज्ञा घेऊन जान्सनानें तिशीं लग्न लाविलें. ती वयानें ह्मटली तर ह्याच्या दुप्पट होती; सुंदरही सांगण्यासारखी नव्हती; परंतु, ती मोठी बुद्धिवान आणि कुशल असल्यावरून त्यास आवडली असावी असें वाटतें. हें सगळें रूचीवर आहे.

ह्मणून ह्याविषयीं कोणास बरें वाईट ह्मणण्यास कोणा० अधिकार नाहीं.

ह्यानंतर, लिचफील्द येथें जान्सनानें एक शाळा घातली; परंतु, त्याची खरी योग्यता तेव्हां कोणाला समजली नव्हती. ह्मणून त्याला विद्यार्थी मिळाले नाहींत. आणखी दुसरें असें आहे कीं, मुलांस शिकविण्याचें काम हें प्रथम हलकें व सोपें दिसतें खरें; परंतु, गहनगहन विषयांवर विचार करणाऱ्यांस सुद्धां तें कधीं कधीं साधत नाहीं असें होतें.

असा शाळेचा बेत फसला, तेव्हां जान्सन, कांहीं उद्योग मिळविण्याकरितां लंदन शहरीं आला. आणि पुढें तेथें त्यानें आपले बायकोलाही आणिलें. त्या ठिकाणीं त्यानें कितीएक पुस्तकें लिहिलीं. त्यांच्या योगानें त्यास पैसा मिळून त्याची बरीच प्रसिद्धि झाली. ह्या सुमारास तो २९ वर्षांचा होता.

तो अडतीस वर्षांचा असतां आपला इंग्लिश भाषेचा कोश लिहूं लागला. त्या कामांत गुंतला असतां दाक्तर आदाम ह्या नांवाचा त्याचा मित्र त्यास भेटावयास आला. तेव्हां—

**आदाम.**— कां, महाराज, हें काम तर फार मोठें आहे; आपल्याला इतक्या शब्दांची व्युत्पत्ति कशी मिळेल.?

**जान्सन.**— अं: त्यांत काय आहे.! हीं कपाटें भरलीं आहेत. शिवाय, वेल्शभाषेच्या ह्मणींचें पुस्तक ज्या गृहस्थानें प्रसिद्ध केलें आहे, तो वेल्श शब्दांची व्युत्पत्ति देणार आहे.

**आदाम.**— होय; पण हें तीन वर्षांत कसें आटपेल.?

**जान्सन.**— त्याविषयीं मला शंका नाहीं. मी हें तीन वर्षांत सहज पुरें करीन.

**आदाम.**— पण, फ्रेंचभाषेचा संपूर्ण कोश तयार करण्यास चाळीस पंडितांस चाळीस वर्षें लागलीं, हें तुह्मांस माहीत आहे ना.?

**जान्सन.**— होय. तें खरें. त्याचें प्रमाण असें. पहा. चाळीस चाळीस सोळाशें, आणि तीन एकें तीन. ह्मणजे, इंग्लिशांस जर फ्रेंच, तर सोळाशेंस तीन, असें प्रमाण बसलें. ह्मणजे, तीन इंग्लिशांबरोबर सोळाशें फ्रेंच. !!

इ० स० १७५२ त त्याची प्रिय भार्या मरण पावली. तेव्हां त्याला फार दुःख झालें असें दिसतें. परंतु कितीएक लोक असें ह्मणतात कीं, ती त्याजपेक्षां पुष्कळ मोठी होती, ह्मणून तिजवर तो मनापासून प्रीति करीत नसे; तर त्याची सगळी प्रीति देखोदेखीची असे. ह्याविषयीं वास्वेलनामक ग्रंथकार असें सांगतो कीं, "प्रीति हा विषय विचाराचा नव्हे, तर मनाच्या रुचीचा आहे. ह्मणूनच, अमक्यावर प्रीति करा, अथवा अमक्यावर करूं नका, असा एकाद्यास आग्रह करणें, ह्यांत कांहीं अर्थ नाहीं." खरें आहे.

जान्सनानें इंग्लिश भाषेचा कोश तयार करून, तो छापण्यासाठीं लार्ड चेस्तरफील्द नामक मोठ्या श्रीमान मुत्सद्यापाशीं आश्रय मागितला. तो त्यानें प्रथम दिला नाहीं. परंतु, कोश उत्तम झाला आहे, आणि तो जान्सन स्वतःच छापेविणार, असें त्यास समजल्यावर, कीर्तीच्या लोभानें, तो त्यास आश्रय देण्यास सिद्ध झाला. त्यानें त्याविषयीं त्याला एक पत्र देखील लिहिलें. त्याचें उत्तर जान्सनानें फार खरमरीत दिलें. त्यांत त्यानें असें ह्मटलें आहे कीं,

"महाराज, मीं आपली प्रथम भेट घेतली, तेव्हांच्या आपल्या रसभरित भाषणावरून मला परम आल्हाद झाला. परंतु, पुनः जेव्हां आपल्या दर्शनार्थ मी आपले घरीं आलों, तेव्हां मला नुसतें कोणीं आंत देखील जाऊं दिलें नाहीं.! ह्या गोष्टीस आज सात वर्षें झालीं. इतके दिवस एकसारखे श्रम करून, अनेक अडचणी सोसून, मीं आपलें पुस्तक छापण्याच्या वेत्रास आणिलें आहे. ह्या कामीं मला कोणीं एका शब्दाचें साह्य केलें नाहीं, अथवा आश्रयाविषयीं कोणीं वचन दिलें नाहीं. ही ह्मणजे मी आपलेपाशीं रड गात आहे, असें आपण मनांत आणूं नये. परंतु, माझा कोणी इतका अपमान करील असें मला कधीं वाटलें नव्हतें, आणि आजपर्यंत मला आश्रयदाताही भेटला नव्हता.-- आशा स्वप्नांतून जागें झाल्यास आज बरेच दिवस झाले आहेत. आपणांस कळावें." याच्ञा फार कठिण आहे. तिजपासून सुख होतें थोडें, आणि दुखः होतें फार; ह्मणूनच चतुर पुरूष ती होईल तितकी टाळितात.

आपला इंग्लिश भाषेचा कोश तयार करीत असतां, जान्सनानें त्याचीं कांहीं पृष्ठें पाहाण्यासाठीं, आपला मित्र दाक्तर विच ह्याजकडे पाठविलीं. त्यांबरोबर त्यानें त्यास जें पत्र लिहिलें, तें असें.—

"विनंती विशेष.--माझ्या कोशाचीं जीं पृष्ठें आतां माझ्या हाताशीं होतीं, तीं हल्लीं आपणांस अवलोकनार्थ पाठविलीं आहेत. हीं जर आपणांस आवडलीं नाहींत, तर त्यांजविषयीं आपण मला कांहीं एक कळवूं नये, एवढेंच मागणें आहे. लोभ असावा हे विनंती."

ह्या पत्रावरून अनेक अनुमानें काढितां येतात. तीं अ-

शीं. आपला कोश बिनचूक आहे, असा जान्सनचा पूर्ण विश्वास असला पाहिजे; अथवा, बिच ह्यास त्यांत शुद्धाशुद्ध पाहण्याची शक्ति नाहीं, असा त्याचा समज असावा; अथवा, खरीं खोटीं कशीं कोणींही अशुद्धें दाखविलीं, तरी तीं नीट करावयाचीं नाहींत, असा त्यानें दृढ निश्चय केला असावा. ह्यांतलें शेवटचें अनुमान जर खरें असेल, तर त्याची आणि ह्या पात्राची संगति चांगली जमते. ती अशी. कोणाच्या ही सूचनेवरून आपला लेख फिरावयाचा नाहीं, असा जान्सनाचा निर्धार असतां, जर कांहीं खरे दोष बिच ह्यानें दाविले असते, तर त्यांपासून मनाला नुसतें वाईट मात्र वाटलें असतें; त्याचा दुसरा कांहीं उपयोग झाला नसता; असें पाहिलें असतां, त्याचें पत्र त्याच्या विचारानुरूप दिसतें, हें उघड आहे. ज्या गोष्टीचा उपयोग होत नाहीं, अथवा करावयाचा नाहीं, ती घ्यावी तरी कशाला, असें त्याला वाटलें असावें. होय. अशीच एक दुसरी गोष्ट आहे. एक तारू, तुफान होऊन अंगदीं बुडूं लागलें; आंतले बहुतेक सर्व लोक घाबरून रडूं लागले; परंतु, एका मनुष्यास इतकी गाढ निद्रा लागली होती कीं, तो इतक्या ओरडाओरडीनें सुद्धां जागा झाला नाहीं. तेव्हां जवळच्या एका गृहस्थानें त्यास उठवून ह्मटलें, "अहो, तुह्मी निंजतां काय.! गलबत बुडूं लागलें ना.! उठा लवकर.!" तो मनुष्य चांगला जागा झाल्यावर उठविणारास अतिशयित रागें भरून शिव्या देऊं लागला. त्याला तिसऱ्यानें विचारिलें, "अहो अशा प्रसंगीं तुह्मीं सगळें एकीकडे ठेवून हें काय आरंभिलें आहे?" तेव्हां त्यानें उत्तर दिलें, "अहो, ह्या मूर्खानें मला कशासाठीं हो उठविलें.? मी जागा,

झाल्यानें हें जहाज बचावणार आहे काय.? मला उठविलें नसतें तर मी बुडेपर्यंत आनंदाच्या निद्रेंत स्वस्थ राहिलों असतों.! आतां गलबत बुडेपर्यंत व्यर्थ तळमळ करावी लागणार कीं नाहीं.! आणि ती ह्या मूर्खांच्या वेडेपणामुळें.!" ह्यासारखा जान्सनाचा अभिप्राय दिसतो. असो.

इ० स० १७५५ त त्याचा कोश छापून तयार झाला. आणि त्याच सुमारास विद्वत्ताप्रदर्शक एक पदवी आक्सफोर्डच्या विद्वत्सभेनें त्यास दिली.

इ० स० १७६३ च्या आरंभींच जान्सनाची आणि बास्वेलाची प्रथम भेट झाली. तेव्हांपासून स्नेह वाढतां वाढतां ते दोघे जीवलग मित्र झाले. बास्वेल हा जान्सनास केवळ देवाप्रमाणें मानीत असे. त्या उभयतांचा एकत्र सहवास फार दिवस झाला. पुढें बास्वेलानें जान्सनाचें चरित्र लिहिलें. तो ग्रंथ मोठा आहे. त्यांत जान्सनाचा पत्रव्यवहार, व त्याच्या बोलण्याचा कोटिक्रम, हे जितके उपलब्ध होते, तितके दिले आहेत. त्यांपैकीं समयोचित भाषणांतली वादविवादाची शैली, आणि हातीं घेतलेला पक्ष स्थापित करण्याची शक्ति, ह्या उत्तम प्रकारें दिसून येतात. त्यानें अनेक ग्रंथ लिहिले, ते सर्वमान्य आहेत. त्यांविषयीं आह्मीं येथें फार बोलत नाहीं. कारण, त्याच्या समयोचित भाषणांच्या मासल्यांनीं आपल्या सहृदय वाचकांचें मनोरंजन करावें, असा आमचा फार हेतु आहे. तो एके समयीं पापापुण्याविषयीं बोलत असतां ह्मणाला, "कृत्याचें बरेवाईटपण कृत्याच्या स्वरूपावरून समजूं नये; तर तें तें करण्याच्या हेतूवरून ओळखावें. समजा, एक भिकारी चालला आहे, त्याचें डोकें फोडण्याच्या हेतूनें मीं मोठ्या जोरा-

नें एक रुपया त्याजकडे फेंकिला; तो त्यानें झेलिला आणि त्याचे दाणे घेऊन खाल्ले. ह्यांत, माझ्या रुपयानें त्याचें बरें झालें खरें; तरी, त्याला ताप दिल्याचें पाप माझ्या माथां यावयास चुकलें नाहीं. कारण, हेतु पापमूलक होता. त्याप्रमाणें, धर्माचीं कृत्यें जीं आहेत, तीं श्रद्धापूर्वक जर आपण केलीं नाहींत, तर तीं आपणास कधींही उपयोगीं पडावयाचीं नाहींत." खरें आहे.

एके वेळीं एका ऐरिश मनुष्यापाशीं मनुष्याच्या काळेपणाविषयीं जान्सन वादविवाद करीत होता. तेव्हां तो ह्मणाला, "मनुष्याच्या काळेपणाचीं कारणें तीन सांगतात; तीं हीं; काळे लोक ते हामचे वंशज असावे, हें एक; देवानें प्रथमच, काळे आणि गोरे असे दोन प्रकारचे लोक निर्माण केले, असें समजतात, हें दुसरें; आणि उष्णतेच्या तापामुळें मनुष्याची कातडी करपून काळी होते, हें तिसरें. ह्याविषयीं प्राणिविद्यावेत्त्यांनीं पुष्कळ वादविवाद केले आहेत; पण, त्याचें खरें कारण अमुकच आहे, असें अद्याप ठरलें नाहीं."

एके समयीं बास्वेलापाशीं त्याच्या एका मित्रानें ह्मटलें कीं, आपण अमक्या नाटकाला वाईट ह्मणतों मात्र, पण तसें देखील आपणाला लिहितां येणार नाहीं. ही गोष्ट बास्वेलानें जान्सनास सांगितली. तेव्हां जान्सन ह्मणाला, "अंः, छिः, हें ह्मणणें कांहीं बरोबर नाहीं. तुह्मांला नाटक जरी लिहितां न आलें, तरी वाईटाला वाईट ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं. सुतारानें मेज जर वाईट करून दिलें आहे, तर त्याला वाईट ह्मणण्यास आपणाला मेज करतां आलें

पाहिजे असा अर्थ नाहीं. कारण, मेज करणें हा मुळीं आपला धंदाच नव्हे."

इंग्लंदच्या राज्यव्यवस्थेमध्यें असा एक सिद्धान्त समजतात कीं, "राजाच्या हातून कधीं अन्याय होत नाहीं." ह्याविषयीं जान्सन आणि त्याचा मित्र गोल्दस्मिथ ह्यांचें एकदां बोलणें झालें. तेव्हां गोल्दस्मिथ ह्यानें असा आग्रह धरिला कीं, "जें नीतिदृष्ट्या खोटें आहे, तें राज्यव्यवहारदृष्ट्या खरें ठरावयाचें नाहीं. ह्मणजे, राजा, स्वाधिकारपरत्वें, बरेंवाईट करण्याचा हुकूम देण्यास समर्थ आहे; तेव्हां साक्षात् क्रियेवरून विचारानें पाहिलें असतां राजाचे हातून अन्याय होतो, असें ह्मटल्यास चिंता नाहीं." त्यावर जान्सनानें उत्तर केलें, "अहो, क्षणभर तुह्मींच जरा विचार करा. पहा, आपल्या राज्यरचनेमध्यें, राजा ह्मणजे सर्वांत श्रेष्ठ, सर्वांत मोठा, असा मानिलेला आहे. त्याची योग्यता इतर सर्वांहून फार मोठी आहे. त्याची चौकशी करावी, असा अधिकार कोणासही नाहीं. आणि ह्मणूनच राजाचे हातून अन्याय व्हावयाचा नाहीं, असें आह्मी समजतों. ह्मणजे, राज्यांत अपराध घडतील, त्यांची यथायोग्य चौकशी होणें हें आवश्यक आहे; आणि श्रेष्ठत्वाच्या नात्यानें राजाच्या हातून घडलेल्या अपराधाची चौकशी होण्यास मार्ग नाहीं; तेव्हां राजाच्या हातून अपराध होत नाहीं, असें घेऊन चालणें हें बरें नव्हे काय?"

इ० स० १७६३ च्या जुलै महिन्याच्या १४ व्या तारखेस त्याचा मित्र बास्वेल हा त्यास भेटावयास गेला. त्या दिवशीं पाऊस पडत असून हवा अगदीं सर्द झाली होती

तिजविषयीं गोष्ट निघाली, तेव्हां बास्वेल ह्मणाला, "ह्या हवेनें मला आज कसेंसेंच झालें आहे; मला कांहीं हुशारी वाटत नाहीं; तरी ही हवा झाडांझुडपांस आणि शेतभातांस फार उत्तम आहे." तें ऐकून जान्सन ह्मणाला, "अहो, ही हवा वनस्पतींस चांगली आहेना.? बरें तर; त्या वनस्पति जे प्राणी खातात त्यांस, आणि ते प्राणी जे कोणी खातात त्यांस, ह्या उभयतांसही परंपरेनें ती सुखावह होईल."

दुसरे एके वेळीं जान्सनास—

**बास्वेल.**— अहो, माझा बाप तुह्मांपेक्षां वृद्ध आहे असें नाहीं; दिपून जाण्यास तुमच्यापेक्षां विद्येनें किंवा योग्यतेनें फार मोठा आहे असें नाहीं; आणि सभ्यही उत्तम प्रतीचा आहे; असें असतां त्याच्यापेक्षां तुमच्या सहवासांत मला बरें वाटतें, आणि माझा काळ विशेष आनंदानें जातो, ह्याचें कारण काय.?

**जान्सन.**— अहो, मी सर्व लोकांत मोकळा राहातों, त्यांचीं मतें काय आहेत तीं पाहातों, आणि त्यांप्रमाणें मी आपलीं मतें बदलून त्यांशीं वागतों. आणि तुमचा बाप ह्या देशाच्या एका कोंपऱ्यास न्यायाधीश आहे; तो जुना आहे; आणि त्याचीं जुनीं मतें आहेत तशीं आहेत; हें एक कारण. आणि दुसरें एक असें आहे कीं, पितापुत्रांचें बहुतकरून जमत नसतें; कारण, पिता पुत्रावर आपला हुकूम चालवावयास पाहतो, आणि पुत्र स्वतंत्रपणें वागूं इच्छितो.

**बास्वेल.**—माझा बाप मला वकील होण्याविषयीं अतिशयित आग्रह करील असें दिसतें. तें मला आंवडणार नाहीं.

**जान्सन.**— अहो तुह्मांस इतकी धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. तो, फार झालें तर, तुह्मांला वकील व्हा. इत-

कें सांगेल; परंतु त्या कामांत तुह्मांकडून फार मेहनत कर-विणें हें त्याच्या हातीं नाहीं. तुह्मांला माहीत आहेना, घोडा पाण्यावर नेण्यास एक माणूस पुरतो, परंतु तो पाणी पिई असें करण्यास वीस माणसें सुद्धां पुरावयाचीं नाहींत. तुह्मी त्याच्या इच्छेप्रमाणें वागलां नाहीं, तर त्याला वाईट वाटेल ही गोष्ट खरी आहे; पण त्यापासून दुसरें कांहीं व्हावयाचें नाहीं. व्यवहार चालण्यास कायद्याचें ज्ञान जितकें आवश्यक आहे, तितकें संपादण्याविषयीं त्यानें जर तुह्मांस आग्रह केला, तर तो वाजवी आहे, असें ह्मटलें पाहिजे.'

पुढें दुसरे एके प्रसंगीं गोष्टी निघतां निघतां जान्सन ह्मणाला, "दया ही मनुष्याला स्वभावतः मूळचीच असते, असें नाहीं. मुलें फार क्रूर असतात; त्यांप्रमाणें रानटी लोक.ही फार क्रूर असतात. दयालुत्व हें मग प्राप्त होतें, आणि तें विचारानें व अभ्यासानें वाढतें. प्राणी विपत्तींत तडफडत दृष्टीस पडला असतां वाईट वाटतें, ही गोष्ट खरी आहे; तथापि तेव्हां आपले मनांत दया असते असें नाहीं. प्राण्यांस दुःखमुक्त करण्याची इच्छा आपणांस होईपर्यंत आपले ठायीं दया नसते, हें खचीत समजावें. एकाद्या ठिकाणीं भोजनास जाण्याचा वेळ अगदीं टळून जात असला, तर आपण गाडीवाल्यास गाडी सपाट्यानें हांकायास सांगतों; त्यानें घोड्यांस चपाचप चाबूक ओढिले, आणि जर आपलें लक्ष त्यांजकडे गेलें, तर त्या गरीब प्राण्यांस दुःख होतें ह्मणून वाईट वाटतें खरें; पण आपण त्यास पुरे ह्मणत नाहीं. इतकेंच केवळ नव्हे; तर जरा आणखी 'जलद चालूं दे ह्मणून सांगतों.!!"

मनुष्याच्या स्थितीच्या उच्चनीचत्वाविषयीं गोष्टी चालल्या असतां, देम्पस्तर ह्याचें मत असें पडलें कीं, सुज्ञ मनुष्यांस संपत्ति आणि पदवी, हीं कांहीं नाहींत; तर, त्यांनीं मनुष्याची योग्यता त्याच्या अकलेच्या मानानें कमजास्त समजावी. त्यावर जान्सन ह्मणाला, " जर मनुष्य रानटी असून जंगलांत एकटा राहात असला, तर त्याविषयीं तुमचें ह्मणणें कदाचित् शोभेल; परंतु, आपणां सुधारलेल्या ज्ञानसंपन्न लोकांत आपण सर्व प्रकारीं परस्परांवर अवलंबून आहों; इतर मनुष्यांनीं आपणांस चांगलें ह्मटलें तरच आपणांस सुख व्हावें, एरव्हीं होऊं नये, अशी आपली स्थिति आहे. आणखी असें पहा कीं, ह्या सुधारलेल्या लोकांत नुसत्या बाह्य स्वरूपावरून देखील मनुष्यास मान मिळतो. हें अज्ञानमूलक आहे, असें तुह्मी पाहिजे तर ह्मणा; परंतु, साधारण रीति आहे ती सांगितली. आपल्या महा भजनालयास कांहीं अपाय घडून जर त्याची धूळ झाली, तर, त्या धुळींतल्या एका कणाविषयीं आपले मनांत कांहीं तरी येईल काय ? कांहीं नाहीं. त्याप्रमाणेंच मनुष्याच्या सुखावस्थेचें आहे. ह्मणजे, तिचे घटकावयव अनेक आहेत. त्यांतला एकेक अवयव जर वेगळा वेगळा पाहूं लागलों, तर तो अगदीं यःकश्चित् दिसेल. सुधारलेल्या लोकांत तुह्मांला पैसा जसा उपयोगीं पडेल, तसा सद्गुण उपयोगीं पडावयाचा नाहीं. अनुभव घेऊन पहा. बाहेर रस्त्यावर जाऊन, एका मनुष्याला तुह्मी एक रुपया द्या, आणि दुसऱ्या एकाला नीतिशास्त्रावर एक उत्कृष्ट व्याख्यान द्या, आणि मग तुह्मांला मान अधिक कोण देतो तें पहा! नुसतें जगण्याकरितां खायचें प्यायचें, असें जर ह्मणाल, तर

एका मनुष्याला एका वर्षाला तीस रुपये बस आहेत. ह्मणजे, कसें तरी पोटभर खायाला मिळेल, कोठें तरी, वारा, पाऊस न लागे अशा जागीं राहायाला सांपडेल, आणि पाहिजे असल्यास, वैलाच्या कातड्यासारख्या लठ्ठ कापडाचा चांगला टिकाऊ आंगरखा घेतां येईल; इतकी तजवीज तीस रुपये सालांत निघेल, आणि मनुष्याचा जीव वांचून निर्वाह चालेल. आतां ह्याहून जो अधिक खर्च करणें तो लौकिकार्थ होय. साहाशें रुपयांचें ज्यास दर सालचें उत्पन्न असतें, त्यास बराच मान मिळतो; तेंच साहा हजारांचें असलें ह्मणजे त्याहून अधिक मिळतो; ह्याप्रमाणें सन्मानाचें मान द्रव्याच्या मानाप्रमाणें वाढत जातें, ह्यांत कांहीं संशय नाहीं. ज्याचे जवळ द्रव्य पुष्कळ आहे, तो, कदाचित्, ज्यांचे जवळ द्रव्य थोडें आहे, त्यापेक्षां अधिक सुखी नसेल; परंतु त्यास दुसरीं अनेक कारणें असतात. परंतु, सुधारलेल्या लोकांमध्यें, ज्याचे जवळ द्रव्य पुष्कळ, तो बहुधा सुखी असतो. कारण, द्रव्याचा सद्व्यय केला असतां, त्यापासून सुख झाल्यावांचून बहुधा राहात नाहीं. वस्तुतः पाहिलें असतां, द्रव्याचा स्वतः सिद्ध उपयोग कांहींएक नाहीं. योग्य खर्चाच्या द्वारें तें आपण लोकांस द्यावें, तेव्हांच त्यापासून आपणांस सुख प्राप्त होतें, एरव्हीं होत नाहीं. मनुष्यास नवीन गोष्टी सांगण्यांत एक प्रकारची हौस वाटते; आणि कोणत्याही विषयाच्या असत्पक्षाविषयीं बोलूं लागलें असतां, तशा गप्पा पाहिजेत तितक्या मारतां येतात. ह्यासाठीं मी लहानपणीं बहुधा असत्पक्ष घेऊन वाद करीं, आणि तेणेंकरून मला त्याजवर हव्यातशा नवनव्या कल्पना चालवायास सांपडत. संपत्ति आणि बाह्यस्वरूप

ह्यांच्या विरुद्ध ज्या गोष्टी सांगतां येतात, त्यांपेक्षां अधिक अनुकूल गोष्टी दुसऱ्या कोणत्या एकाद्या विषयाविषयीं सांगतां येणार नाहींत असें नाहीं. पहा, उदाहरणार्थ चोरी घेऊं. चोरी करणें हा अपराध आहे, असें कां समजावें.? आपणांस ठाऊक आहे कीं, लोकांपाशीं जी फार संपत्ति जमते, ती कांहीं तरी अन्यायाचरण केल्याशिवाय जमत नसते. बरें, ही जर गोष्ट खरी आहे, तर अशी अयोग्य प्रकारें संपादिलेली संपत्ति कोणाएकास यथेच्छ उपभोगूं देणें, हें योग्य आहे काय.? उघड आहे, कीं योग्य नाहीं. बरें तर मग अशी संपत्ति चोरणें ह्यांत मोठा दोष तो कोणता, आणि पाप तें काय.? आणखी दुसरें असें समजा कीं, द्रव्याच्या सांप्रतच्या मालकास द्रव्याचा उपयोग योग्य रीतीनें करतां येत नाहीं; आणि दुसऱ्या एकास त्याचा उपयोग उत्तम समजत आहे; तर, ह्या दुसऱ्यानें त्या धनवानाचें द्रव्य चोरिलें असतां, तें कृत्य चांगलें झालें असें कां समजूं नये.? परंतु चोरी करणें हें फार वाईट आहे, असें सर्व जगाच्या अनुभवास आलें आहे. तें इतकें कीं चोरास फांशीं देण्यास जनांस कांहींएक संकोच वाटत नाहीं. मी अति दरिद्री असून ह्या शहरामध्यें दारोदार हिंडत होतों, तेव्हां दरिद्रावस्था ही फार चांगली आहे, हें मी मोठ्या प्रयत्नानें सिद्ध करीत असें; तथापि, आपण अगदीं कंगाल आहों, असें मनांत येऊन मला वाईट वाटल्याशिवाय राहात नसे. दारिद्र्य हें वाईट नाहीं, असें सिद्ध करण्यास ज्या गोष्टी आपण सांगतों, त्यांवरूनच, दारिद्र्य हें फार वाईट आणि दुःखप्रद आहे, असें उघड होतें. अहो, तुह्मी पुष्कळ संपत्ति मिळवा ह्मणजे तुह्मांस सुख होईल, असें लोकांस शिकविण्यास को-

णास श्रम करावे लागतात काय.? राजाला दुःखें आणि संकटें कोणतीं असतात, हें पुष्कळ लोक जाणतात; तरी त्याचें पद आपणांस मिळावें, अशी त्यांची इच्छा असते.!"

एक अतिप्रसंगीं ग्रंथकार मोठमोठया मुत्सद्दी लोकांची बरोबरी करीत असे, त्याची गोष्ट बास्वेलानें जान्सनास सांगितली; तेव्हां तो ह्मणाला, "अहो, एकादा चाह्मार जर त्या ग्रंथकाराची बरोबरी करण्याकरितां एकदम त्याजपाशीं येऊन बसला, तर, तो त्याजकडे डोळे फाडून पाहूं लागेल. तेव्हां चाह्मारानें त्याला ह्मणावें, एवढे डोळे वटारून तुह्मी मजकडे कां पाहतां.? मी देखील देशाच्या उपयोगीं पडत आहें. माझ्या मेहनतीचें मोल मला मिळतें, ही गोष्ट खरी आहे; तसें तुमच्या मेहनतीचें मोल तुह्मांलाही मिळत आहे; परंतु, तुह्मीं लोकांचें जें काम करितां, तें इतकें अवश्यक नसून, माझ्यापेक्षां तुह्मांस पैसा अधिक मिळतो, एवढेंच वाईट वाटतें. पहा, तुमच्या पुस्तकांवांचून लोकांचें इतकें अडावयाचें नाहीं; पण माझ्या जोडयांसाठीं त्यांचें खचीत अडेल. अशा प्रकारचीं बोलणीं होऊन श्रेष्ठ कोण, ह्याविषयीं नित्य तंटा चालला असता. परंतु, ह्याचा निकाल लोकांमध्यें आज कितीएक वर्षांपूर्वींच होऊन चुकला आहे. आणि त्याप्रमाणें वहिवाट चालली आहे, ह्मणून बरें. नाहीं तर अतिशयित मत्सर माजला असता.!"

दुसऱ्या एका वेळीं गोष्टी चालल्या असतां जान्सन ह्मणाला, "सर्व मनुष्यांमध्यें शाळेंतला विद्यार्थी हा सुखी प्राणी होय." बास्वेलानें प्रतिपक्ष केला कीं, सर्वांमध्यें प्रौढ मनुष्य सखी होय. त्यावर जान्सनानें उत्तर दिलें, "अहो, जगामध्यें मनुष्याची छिः थू होते, त्यापेक्षां, मुलास शाळेम-

ध्यें चार फटके सोसावे लागतात, हें फार कठीण नाहीं. मनुष्याला आपल्या अब्रूची काळजी निरंतर वाहावी लागते. आणि ती अब्रू ज्या ज्या मानानें अधिक असते, त्या त्या मानानें काळजीही अधिक करावी लागते." खरें आहे.

इ० स० १७६३ च्या जुलै महिन्याच्या २६ व्या तारखेस हवा अगदीं सर्द झाली होती. त्या वेळीं बास्वेल हा जान्सनाकडे गेला; आणि ह्मणूं लागला कीं, आज ही अशी हवा पडल्यामुळें कांहीं सुचत नाहीं, कांहीं काम होत नाहीं, आणि प्रकृति बिघडली आहे. त्याजवर जान्सनानें उत्तर दिलें, "हें सगळें काल्पनिक आहे; आणि वैद्यांनीं तर तें फारच फुगविलें आहे. मासा जसा पाण्यांत राहतो, तशीं मनुष्यें हवेमध्यें असतात. ह्मणजे, जितक्या जोरानें हवा त्यांचे शरीरास वरून दाबिते, तितक्याच जोरानें आंतली हवा तिचें वजन सांवरून धरिते. ज्यांना घराबाहेर काम करावें लागतें, त्यांस अशा वाईट हवेपासून कांहीं इजा होत असेल खरी. चांगली हवा असतां घराबाहेर काम जसें होतें, तसें वाईट हवा असतां होत नाहीं, हेंही खरें आहे. तथापि, सुतार, लोहार, शिंपी, इत्यादि घरांत कामें करणारे लोक, पाऊस वगैरे नसून हवा स्वच्छ असतां जितकें काम करितील, तितकें काम, पाऊस वगैरे पडत असला आणि हवा सर्द झाली असली तरी करूं शकतील. ज्यांची प्रकृति अति नाजूक आहे, त्यांस कदाचित् अशी हवा घरांत सुद्धां बाधेल; परंतु, साधारण प्रकृतीच्या मनुष्याला कांहीं देखील वाटणार नाहीं."

तारीख ३ माहे जुलै सन १८६३ रोजीं सकाळीं बा-

स्वेल हा क्वाकर नामक पंथाच्या लोकांच्या भजनालयांत गेला होता. तेथें एका स्त्रीनें धर्मोपदेश केला. तेथली सर्व हकीकत त्यानें जान्सनास त्याच दिवशीं. सांगितली. तेव्हां तो ह्मणाला, "स्त्रीचें धर्मोपदेश करणें हें कुत्र्याच्या माग-च्या पायांवर चालण्यासारखें आहे. ह्मणजे तें जरीं चांगलें होत नाहीं, तरी, आधीं मुळीं तें होतें, ह्याचाच तुह्मांला चमत्कार वाटतो.!"

इ० स० १७६४ त बास्वेल हारविच येथें गेला. तेव्हां त्याजबरोबर जान्सन होता. ते उभयतां तिकडे बरेच दिवस फिरले. नंतर जान्सन लंदन शहरीं परत आला. त्यानें बास्वेलास विद्याभ्यासाविषयीं लंदनाहून एक पत्र लिहिलें. त्यांत एके ठिकाणीं त्यानें असें ह्मटलें आहे.—

"तुह्मीं कोणता अभ्यास करावा, ह्याविषयीं मीं तुह्मांस लिहावें अशी तुमची इच्छा असेल, तर सृष्टिजन्य ईश्वरज्ञान ह्या विषयाचा तुह्मीं अभ्यास करा, असें मी सांगणार नाहीं. कारण, परमेश्वराची इच्छा जाणण्याचा प्रयत्न करावा किंवा न करावा, हा मुळीं प्रश्नच नाहीं, ह्मणजे ह्याविषयीं संशय नको."

"ह्यास्तव, जे विषय इच्छेस आल्यास शिकावे किंवा न शिकावे असे आहेत, त्यांविषयीं मात्र येथें विचार करूं. तुह्मीं कायदे शिकावे, अशी तुमच्या तीर्थरूपांची इच्छा आहे, आणि प्राचीन भाषा शिकाव्या असा तुमच्या मनानें नाद घेतला आहे. ह्यास्तव तुह्मीं हे दोन्ही विषय व्हावे हें मला योग्य दिसतें. मुक्काम पडेल त्या ठिकाणीं निदान कांहीं तास तरी पुस्तकांत घालवा. मन लागत नाहीं असें तुह्मीं ह्मणतां, त्याचा अर्थ इतकाच कीं, लाभहानी

च्या आशाभयानें घडोघडी अनेक प्रकारचे विचार प्रबलदुर्बलत्व पावून, चित्त, त्यांच्यांत लडबडत असतें. तें कोणत्या एका ठिकाणीं राहत नाहीं."

आतां हा विषय बराच लांबला, ह्मणून जरा आटपता घेतला पाहिजे. ह्या सुमारास जान्सनाचें वय चौपन पंचावन वर्षांचें होतें. त्याचें पुढचें चारित्रही फार चित्तवेधक आहे. तें पुढच्या भागीं सादर करूं.

---

## भाग दुसरा.

जान्सनाचा मित्र बास्वेल हा प्रवासास गेला होता, असें मागच्या भागांत सांगितलें आहे, तो इ० स० १७६६ च्या फेब्रूवारी महिन्यांत लंदनास परत आला. त्याची आणि जान्सनाची भेट झाली तेव्हां उभयतांस परम संतोष झाला. जान्सन हा पहिल्यापासून धार्मिक होताच. त्यांत, त्याचें जसजसें वय होत गेलें, तसतशी ती त्याची वृत्ति वाढत चालली. तो एके वेळीं ह्मणाला, "जे लोकहिताचीं कामें करून दमले आहेत, अथवा तीं करण्यास ज्यांस सामर्थ्य नाहीं, त्यांनीं आपले दिवस मठांत घालवावे, हा मठांचा मुख्य उपयोग आहे; नाहीं तर, मला वाटतें कीं मठ ह्मणजे आवश्यक आहेत असें नाहीं. लोकोपयोगीं कामें करणें हें आपलें मुख्य कर्तव्य होय; तें झालें ह्मणजे, आपल्या आत्म्यास अंतीं उत्तम गति कशी प्राप्त होईल, ह्या गोष्टीकडे आपलें सर्व लक्ष लागावें. तरूण होतकरू मनुष्यांनीं इतर कामें सोडून मुक्तिप्राप्तीच्या उद्योगास लागावें, हें आवश्यक आहे असें नाहीं, अथवा योग्यही नाहीं."

गोल्दस्मिथ ह्मणून एक नामांकित इंग्लिश ग्रंथकार जान्सनाच्या मित्रमंडळींत होता. तो आणि वास्वेल हे एके दिवशीं त्यास भेटण्यास त्याचे घरीं गेले. तेव्हां जान्सनास.—

**गोल्दस्मिथ.**— नाटकांकडे जसें आपलें लक्ष पूर्वी फार असे, तसें आतां नाहीं वाटतें. ?

**जान्सन.**— होय. नाहीं खरें. मनुष्याची रुचि वयपरत्वें अगदीं बदलून जाते. आठ दहा वर्षांच्या मुलाला खुळखुळ्यांत कांहीं मौज नाहीं असें वाटूं लागतें. आणि ह्मातार्‍या मनुष्यास तरुणपणाच्या इष्कांत कांहीं नाहीं असें वाटतें. हा आयुष्यमार्ग जसजसा आपण क्रमीत जातों, तसतशा, ज्या वस्तु एके समयीं अतिशयित प्रिय असतात, त्या, दुसरे वेळीं अगदीं नीरस भासतात. मग त्यांचें ओझें होतें ह्मणा, अथवा, त्यांपेक्षां चांगल्या अशा दुसर्‍या सांपडतात ह्मणून ह्मणा.

**वास्वेल.**— पण आतां आपण कांहीं लिहीत कां नाहीं.?

**गोल्दस्मिथ.**— होय. आपण कांहीं लिहिलें पाहिजे खचीत.

**जान्सन.**— नको आतां. आतां मी आणखी लिहिलेंच पाहिजे असें नाहीं. मनुष्याला एकादें काम जितकें करतां येत असेल, तितकें त्यानें केलेंच पाहिजे असें नाहीं. मनुष्यानें आपल्या आयुष्याचा कांहींतरी भाग केवळ आपले हिताकरितां असा घालविला पाहिजे. पुष्कळ लढाया मारल्यावर जर कोणी शूर पुरुष स्वस्थपणांत काळ घालविण्यास चाकरी सोडून देऊन एकीकडे एकाद्या खेड्यांत जाऊन राहील, तर त्यास दोष देणें योग्य नाहीं. पुष्कळ

कामकाज मोठ्या शहरामध्यें केल्यावर जर कोणी वैद्य, स्वस्थपणासाठीं खेड्यांत जाऊन राहील, आणि कमी काम करील, तर त्यास काय ह्मणून शब्द लावावा ? त्याप्रमाणें, मी संभाषणानें होईल तितकें जनहित करीत आहें.

**बास्वेल.** -- तरी, आपणांस कांहींएक न लिहिण्यापेक्षां लिहिण्यांत विशेष आनंद वाटत नाहीं, ह्याचें मला मोठें नवल वाटतें. !

**जान्सन.** -- सुखेनैव वाटो. !

जान्सनाच्या चरित्रांत ज्या कितीएक मोठ्या गोष्टी आहेत, त्यांपैकीं एक गोष्ट १७६७ च्या फेब्रूआरी महिन्यांत घडली. ती अशी. जान्सन हा मोठा विद्वान् आहे, अशी विलायतेमध्यें चोहींकडे प्रसिद्धी झाली होती. ती इतकी कीं, तेव्हां तिसरा जार्ज हा राजा तेथच्या गादीवर होता, त्यासही जान्सनास पाहण्याची इच्छा उत्पन्न झाली. ओल्द बकिंह्याम नामक राजवाड्यामध्यें, ह्मणजे जेथें राजा राहात असे तेथें एका खोलींत एक मोठें पुस्तकालय होतें, तेथें जान्सन हा वाचण्याकरितां आणि अभ्यास करण्याकरितां येत असे. त्या पुस्तकालयावर मुख्य कामदार बर्नार्द ह्मणून एक गृहस्थ होता. त्यास बोलावून नेऊन राजानें असें सांगितलें कीं, पुनः जेव्हां जान्सन पुस्तकालयांत येईल, तेव्हां मला तावडतोब कळवा. त्याप्रमाणें, जान्सन येऊन वाचण्यांत आणि विचारांत मग्न झाल्यावर, त्याला न कळावितां बर्नार्द ह्यानें हळूच जाऊन राजास श्रुत केलें. राजा पुस्तकालयांत येऊन गुपचूप उभा राहिला. जान्सन हा विचारांत गढला होता, त्यास बर्नार्द ह्यानें जवळ जाऊन कानांत सांगितलें कीं, "अहो,

सरकारस्वारी आली आहे.!" तें ऐकतांच जान्सन दचकून उठून उभा राहिला. तो राजा त्याजपाशीं आला, तेव्हां त्यानें मोठ्या आदबीनें त्याचा सत्कार केला. आणि राजा मोठ्या प्रीतीनें त्याजपाशीं बोलूं लागला. इकडच्या तिकडच्या अनेक गोष्टी झाल्यावर राजा जान्सनास ह्मणाला, "आपण सध्या कांहीं लिहीत आहां काय?" जान्सनानें उत्तर दिलें, "नाहीं, कांहीं नाहीं. कां कीं, मला जें काय कळत होतें, तें मीं जनांस विदित केलें आहे; मला आणखी ज्ञान मिळविण्यास आणखी वाचिलें पाहिजे." त्यावर राजा ह्मणाला, "पण आपण बहुतकरून कोणाच्या गोष्टी उतरून घेत नसतां; जें लिहितां तें बहुधा स्वकल्पनेचें नवेंच कांहीं तरी असतें." त्यानंतर जान्सन बोलला, "तसें असेल कदाचित्. परंतु, ग्रंथकार ह्या नात्यानें माझें जें कर्तव्य ह्मणून मला वाटतें, तें मी करून चुकलों आहें." ह्यावर राजा ह्मणाला, "होय. तुह्मीं जर इतकें उत्तम न लिहितां, तर, तुह्मीं आपलें कर्तव्य करून चुकलां, आणखी कांहींएक करण्याचें कारण नाहीं, असें मला सुद्धां वाटलें असतें." ह्यावरून, जान्सनाच्या लेखांविषयीं राजाचा अभिप्राय काय होता, तो सहज दिसून येतो.

आपल्या प्रभूकडून एवढा मान मिळणें हें मनुष्यास अत्यंत भूषणप्रद होय. ह्या लाभापुढें दुसऱ्या कोणत्याही लाभाची विशेष मातब्बरी नाहीं. खुद्द जान्सन देखील ही गोष्ट आपल्या मित्रमंडळींत मोठ्या डौलानें सांगत असे.

वकीलीच्या धंद्याविषयीं एके दिवशीं गोष्टी निघाल्या. तेव्हां जान्सनासः—

**बास्वेल.**— महाराज, वकीलीचें काम करीत असतां,

अत्यंत नीतिमान् मनुष्याच्या मनास कधीं कधीं मोठी अडचण पडत असेल, नाहीं बरें?

**जान्सन.**— ती कसली बरें? जर त्यानें आपलें काम योग्य रीतीनें बजाविलें, तर कांहींएक अडचण पडावयाची नाहीं. हव्या तशा गप्पा मारून आपल्या अशीलांस फसवूं नये, आणि न्यायाधीशास खोटी गोष्ट सांगूं नये, ह्मणजे झालें.

**बास्वेल.**— पण, जो पक्ष असत् आहे असें तुह्मी जाणतां, तो घेऊन भांडण्याविषयीं आपण काय ह्मणतां.?

**जान्सन.**— पक्ष सत् आहे, किंवा असत् आहे, ह्याचा निर्णय करणें न्यायाधीशाकडे आहे, वकीलाकडे नाहीं; ह्मणजे, अमुक पक्ष असत् आहे, असें न्यायाधीशानें ठरविल्याखेरीज त्यास असत् ह्मणतां येत नाहीं. वकीलानें ज्या खऱ्या खऱ्या गोष्टी असतील त्या न्यायाधीशास कळवाव्या, एवढेंच त्याचें काम आहे. आपला पक्ष अशक्त आहे, असें वकीलाच्या मनांत येण्यास मुख्य कारण ह्मटलें असतां प्रमाणांची निर्बलता होय. पंण तेवढें बस नाहीं; कारण, ज्या प्रमाणांवरून एकाद्या गोष्टीविषयीं वकीलाच्या मनाची खातरी होत नाहीं, त्या प्रमाणांवरून त्या गोष्टीविषयीं न्यायाधीशाची खातरी होणार नाहीं ह्मणून कशावरून.? बरें, अशी जर त्याची खातरी झाली, तर वकीलाचें मत भ्रांतिमूल होतें, आणि न्यायाधीशानें केलें तें बरोबर केलें, असें होईल कीं नाहीं.? न्याय निवडणें हें न्यायाधीशाचें काम आहे. अमुक पक्ष असत् आहें, असें जरी वकीलास वाटलें, तरी त्यानें त्या मतावर अवलंबून राहूं नये. तर, त्यानें, ज्या खऱ्या गोष्टी असतील त्या न्यायाधीशास

ऐकवाव्या, आणि त्यांवरून जें त्याचें मत पडेल तें खरें समजून चालावें, एवढेंच वकीलाचें काम आहे.

**बास्वेल.**— अहो, पण मनांत खरोखर आवेश नसून, आवेश दाखवून बोलणें, अथवा, वास्तविकपणें आपला अभिप्राय एक असून, दुसरा भिन्न अभिप्राय प्रदर्शित होई असें भाषण करणें, हें अत्यंत नीतिमान वकीलाच्या सदाचार अंतःकरणास दोषास्पद नव्हे काय.? ह्मणजे, असावें एक आणि दाखवावें एक, ही लबाडी नव्हे काय.? बरें, असें असत्याचरण न्यायसभेमध्यें जो मनुष्य करील, तो तसें असत्याचरण साधारण इतर लोकांशीं अथवा आपल्या मित्रांशीं करणार नाहीं, असें कशावरून ह्मणावें.?

**जान्सन.**— आपल्या मित्रांशीं असें कोण कशासाठीं वागेल.? आपणां सर्वांस माहीत आहे कीं, वकीलाचा जो आवेश असतो, तो खरीद केलेला असतो, मूळचा स्वाभाविक नसतो; ह्मणजे त्यासाठीं असीलानें पैसा भरलेला असतो. ही खरी गोष्ट जर सर्वत्र प्रसिद्ध आहे, तर वकीलाकडे असत्याचरणाचा दोष तो कसा येतो.? तो आवेश आणि तें आचरण तेवढ्या प्रसंगापुरतें असतें; तो वेळ गेला ह्मणजे वकील आपल्या मूळस्वभावाप्रमाणें वर्ततो. तो सर्व ठिकाणीं आपला वकीलीचा बाणा बाळगीत नाहीं. पैसा मिळविण्यासाठीं, खालीं डोकें वर पाय करून हातांवर चालणारा जो मनुष्य आहे, तो, घडोघडी, इकडे तिकडे जातां येतां तसा चालतो काय.?

ह्या वेळेपर्यंत जान्सनाचीं पुष्कळ पुस्तकें प्रसिद्ध होऊन, तो मोठा ज्ञाता आहे, असें सर्वांस वाटूं लागलें. आणि शिवाय राजाची ओळख पूर्वीं झालीच होती. तेणेंकरून,

लंदन येथें एका नवीन पाठशाळेंत त्याला प्राचीन इतिहासाच्या मुख्य गुरूची जागा मिळाली. ही गोष्ट इ० स० १७६९ त घडली.

बास्वेलाच्या ओळखीच्या एका गृहस्थानें, पहिली बायको मेल्यामुळें दुसरें लग्न केलें, त्यावरून त्यास—

**बास्वेल.**— अहो, तुह्मीं हें चांगलें केलें नाहीं. तुह्मीं दुसरें लग्न केलें ह्यावरून पहिल्या बायकोचें अगत्य, व तिची तुमची प्रीति कितपत होती, हें सगळें दिसून आलें.!

**जान्सन.**—कांहो? असें कां ह्मणतां.? मला वाटतें कीं ह्यांनीं पुनः लग्न केल्यानेंच ह्यांचें आणि ह्यांच्या पत्नीचें किती प्रेम होतें हें स्पष्ट दिसून येतें; आणि हे जर हें दुसरें लग्न न करते, तर मात्र ह्यांनीं आपल्या पहिल्या बायकोचा अपमान केला असें झालें असतें. तें असें. हे जर हा द्वितीय संबंध न करते, तर, पहिल्या कुटुंब्यानें ह्यांस सुख दिलें नाहीं, ह्मणून हे दुसरी बायको करीत नाहींत, असें सहज अनुमान झालें असतें. परंतु, आतां ह्यांनीं लग्न केलें, ह्यावरून एवढें अगदीं उघड होतें कीं, ह्यांच्या पहिल्या बायकोनें ह्यांस फार सुख दिलें आहे; त्या सुखाच्या गोडीनें हा द्वितीय संबंध ह्यांनीं केला आहे.

रुशिआ देशाची लोकसंख्या दिवसें दिवस वाढत चालली आहे, तेव्हां काळेंकरून तें राज्य मोठें होणार, असें कोणी बोलला. तें ऐकून—

**जान्सन.**— ते लोक हल्लीं आहेत त्यांहून अधिक होतील असें वाटत नाहीं. सांप्रत काळीं जितकीं मुलें त्यांस होतात, त्यांहून जास्त व्हावयाचीं नाहींत. लोकांत प्रजोत्पत्ति अधिक करण्याचा उपाय अझूनपर्यंत माझ्या तर को-

ठें समजण्यांत आला नाहीं. मनुष्यास लग्न करण्यास मोठा विचार अथवा फार शाहाणपण लागतें असें नाहीं; तर, ती गोष्ट केवळ मनाच्या कलाची आहे.

**बास्वेल.**— पण देशांतली लोकसंख्या कधीं कमी आणि कधीं अधिक अशी होत नाहीं काय.?

**जान्सन.**— होय. नाहीं तर.? पण त्याचीं कारणें अनेक असतात. ह्मणजे अशीं.— कांहीं कारणानें लोक देश सोडून जातात; लढायांत लोक मरतात; अथवा एकाद्या मोठ्या रोगाची सात येऊन पुष्कळ मनुष्यें प्राणांस मुकतात. बाकी, मुलें जन्मण्याचें जें प्रमाण आहे, तें बहुतकरून सर्वदा सारखें असतें.

**बास्वेल.**— पण आतां आपल्या ह्या देशाविषयीं विचार करून पहा. इतकीं शेतकरी कुळें कोणा एका जमीनदाराच्या अगदीं ताब्यांत आणि काचांत असल्यामुळें प्रजोत्पत्तीस कांहीं कमताई पडत नाहीं काय.?

**जान्सन.**— नाहीं. अगदीं नाहीं. धान्य जितकें उत्पन्न व्हावयाचें तितकें होतें, आणि तें जितक्या माणसांस पुरावयाचें तितक्यांस पुरतें. ह्यांत कांहीं कमजास्त होत नाहीं. पण त्यांत इतकेंच आहे कीं, कधीं कधीं लोकांस आपले निर्वाह कांहीं वेगळ्या रीतीनें करावे लागतात. आपण ह्मेषा असें पाहतों कीं, धान्य महाग झालें कीं मांसाचा भाव उतरलाच. धान्य विकणारे लोकांनीं महागाई करण्याची खटपट चालविली ह्मणजे, त्यांच्यापेक्षा जरा अधिक स्वस्ताईनें धान्य विकण्याचा निश्चय करून बाहेरचे व्यापारी येऊं लागतात. अशा प्रकारें चोहींकडून विपुल धान्य आलें ह्मणजे, गिन्हाईक वांटलें जातें. दाणेवाल्यांस

तरी, सावकारांच्या तगादांवरून वगैरे पैशाची गरज असते. तेणेंकरून, आपला माल आधीं विकण्याच्या घाईनें ते अदशेर पावशेर अधिक लावितात. अशा प्रकारें धान्याची स्वस्ताई होत जाते. आणि मग मांस महाग होऊं लागतें. सारांश, एकंदरीनें सगळ्या खाण्याच्या पदार्थांची सरासरी बरोबर असते. ती सहसा बिघडत नाहीं. लोक पाहिजेत तशा कल्पना करोत. परंतु, जीवव्यापारांची रीत बदलणें हें परम अशक्य आहे, हें लक्षांत ठेवा.

**बास्वेल.**— पण, महाराज, जमिनीचे दर अतिशयित वाढवून जमीनदार लोक आपल्या शेतकरी कुळांस गांजितात, हें फार वाईट नाहीं कांय. ?

**जान्सन.**— होय. फार वाईट आहे. पण तेणेंकरून सर्व देशास पीडा होते असें नाहीं. झालेंच तर थोड्याशा शेतकरी कुळांचें मात्र नुकसान होतें. थोडा विचार पहा. शेतकरी कुळांवांचून जमीनदारांचें चालावयाचें नाहीं; आणि, कांहीं झालें तरी, जमिनीच्या नक्की उत्पन्नापेक्षां अधिक सारा कुळें जमीनदारांस कधीं देणार नाहींत. शेतकीपेक्षां इतर व्यापारांत फायदा पुष्कळ होतो, असें त्या कुळांस दिसून आलें, ह्मणजे तीं दुकानें घालतील. तेव्हां अर्थात् जमिनी रिकाम्या पडतील. आणि मग, जमिनींस शेतकरी कुळें मिळावीं ह्मणून, जमीनदार लोक साऱ्याचे दर कमी करतील.— इंग्लंदामध्यें जमीन हा एक व्यापाराचा जिन्नस आहे. वाण्यास मोल देऊन माल घ्यावा, त्याप्रमाणें इंग्लिश शेतकरी लोक जमीनदारांस सारा देऊन जमिनी घेतात. ह्याहून अधिक त्यांचा संबंध नसतो. इतरांपासून जो सारा मिळण्यासारखा असतो, त्यापेक्षां कमी

सारा घेऊन जमीनदार आपणास जमीन देत नाहींत, हें कुळें पक्कें समजतात.

एके वेळीं स्त्रीसुखाच्या गोष्टी चालल्या असतां, कोणी असें सांगितलें कीं, अमुक गृहस्थास पहिल्या बायकोपासून सुख झालें नाहीं, तरी ती मेल्यावर त्यानें लागलीच दुसरी केली. तें ऐकून जान्सन ह्मणाला, "होय. अनुभव आणि इच्छा ह्यांचें युद्ध लागून, शेवटीं इच्छेस जय मिळाला.!"

ऐरलंदांतलें धान्य बाहेर न पाठविण्याविषयीं कायदा झाला आहे, तेणंकरून त्या देशांतील लोकांस धान्य पुष्कळ मिळूं लागलें, हें फार चांगलें झालें, असें कोणीं ह्मटलें. तेव्हां सरथामस राबिन्सन ह्मणाला, "होय, तें खरें. पण तेणेंकरून इंग्लंदच्या धान्याच्या व्यापारास धक्का आला नाहीं काय.?" त्यास जान्सनानें उत्तर केलें, "अहो, तुह्मी असे कसे हो अडाण्यासारखे बोलतां.? जर कोणी लोक शुद्ध रीतीनें आपला निर्वाह करीत असले, तर आपण त्यांच्या आड यावें काय.?"

मरणोत्तर स्थितीच्या सुखाविषयीं बोलणें निघालें होतें, तेव्हां जान्सन बास्वेलास ह्मणाला, "अहो, परमेश्वराची आपणावर कृपा आहे असा पूर्ण भरंवसा, सत्याचा विचार, आणि सुखोत्पादक कल्पना, हीं अशरीर आत्म्याच्या सुखाचीं मुख्य साधनें होत."

**बास्वेल.**— मरणोत्तर प्राप्त होणाऱ्या सुखांचें वर्णन शास्त्रांत सविस्तर केलें नाहीं, हें खरें आहे; तरी त्याविषयींच्या कांहीं कल्पना करण्यास कांहीं चिंता आहे काय.?

**जान्सन.**— कांहीं चिंता नाहीं. इतर शास्त्रांवरून जें

ह्याविषयीं आपणास समजलें आहे, तें शक्य आहे; आणि जें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे, तें खरें आहे.

**बास्वेल.**— ह्या विषयींच्या सर्व विचारांमध्यें एक विचार फार आनंदजनक आहे. तो हा कीं, आपले सर्व इष्टमित्र आपणांस पुनः भेटतील.

**जान्सन.**— पण, हें लक्षांत ठेवा कीं, तेथें ( देवलोकीं ) आपली सांप्रतची स्थिति राहणार नाहीं. विषयाधीन असें हें नाशिवंत शरीर नष्ट होऊन केवळ आत्मा राहील. नंतर, ज्यांस आपण आपले इष्टमित्र समजतों, त्यांतल्या पुष्कळांचा आणि आपला संबंध तुटेल. पहा. इंद्रियजन्य सुखप्राप्त्यर्थ जे मित्र आपण येथें जोडितों, तें तेथें कशाला पाहिजेत.? दुष्ट जनामध्यें कितीएक सद्गुण असतात; त्यांपासून आपलें हित करून घ्यावें ह्मणून आपण तशा मनुष्यांचा स्नेह संपादितों. अशा मनुष्यांची गरज मरणोत्तर लागावयाची नाहीं. तेव्हां अर्थात् तेही स्नेही नव्हत, असें होणार. इहलोकीं, कितीएक वाईट मनुष्यांस आपण चुकीनें चांगलीं समजून, त्यांशीं मैत्री करितों. परंतु, मरणोत्तर, त्या शुद्ध आणि पवित्र लोकीं सर्वांचीं खरीं स्वरूपें स्पष्ट दिसून येणार. तेव्हां, अशा प्रकारानें आपलें स्नेही मंडळ कमी होणार. आपले सोयरे धायरे भेटतील, असें कितीएक ह्मणतात. पण, अहो, मरणानंतर कशाचें नातें आणि कोणाचा कोण.? त्या लोकीं आत्म्याचें मोल नात्यावर नाहीं,—तर स्वतःच्या पापपुण्यावर आहे.

जुगार खेळण्याविषयीं एकदा गोष्टी निघाल्या होत्या. त्या वेळीं, तो खेळ फार वाईट आहे, असें कितीएकांनीं ह्मटलें. तेव्हां—

**जान्सन.**— अहो, पण पराचा कावळा करूं नका. ज्या मनुष्यांस हा खेळ चांगला माहीत नाहीं, त्यांशीं तो खेळणें हा कांहीं मोठा अपराध आहे असें नाहीं. प्रत्येक मनुष्य आपणास अट्टल समजतो; आणि हिकमतीनें दुसऱ्याचें पागोटें घ्यावयास पाहातो. सर्वांचे प्रयत्न एकसारखे चालले असतात. त्यांत जो बुद्धिवान असतो तो मिळवितो, आणि बाकीचे गमावून तोंडांकडे पाहात बसतात. तेथें लोकांनीं काय करावें.? ही तर अक्कलेची गोष्ट आहे.

**अर्स्किन.**— अहो, असा गैरमाहीत मनुष्य खेळायास बसेल, तर हा त्याचा मूर्खपणा होय. पण तुह्मी त्यांत निष्णात असून त्याजबरोबर खेळूं लागलां, तर तुह्मीं लबाड झालां असें नाहीं.

**जान्सन.**— होय. बरोबर आहे. खऱ्या गोष्टीला कांहीं प्रमाण नको! अहो पण मी असें विचारितों कीं, एका मंडळींतल्या प्रत्येक मनुष्यानें कांहीं एक गोष्ट करण्याचा निश्चय केला; आणि ती, त्यांपैकीं एकानें आपल्या अकलेच्या जोरानें झटकर केली; ह्मणून तो काय त्यांत मोठा अपराधी झाला काय.? स्पार्टा येथील प्रजासत्ताक राज्यामध्यें असा एक परिपाठ होता कीं, चोरी जर उघाडीस आली नाहीं, तर तिला कोणी अपमानास्पद मानीत नसत. जी गोष्ट दुनयेंत कोणी चांगली अशी कबूल करणार नाहीं, ती, ज्या एकाद्या मंडळीनें चांगली अशी मानिली असेल, तिची मी स्तुति कारितों असा अर्थ नव्हे. परंतु, माझें ह्मणण्याचें तात्पर्य ऐवढेंच कीं, अमुक गोष्ट करावयाची, असा निश्चय एकाद्या मंडळीनें सर्वानुमतें केल्यावर, ती गोष्ट त्या मंडळींतल्या एकाद्या मनुष्यानें विशेष चातुर्यानें

चांगली केल्यास, तिच्या योगानें तो दोषी होत नाहीं.

**बास्वेल.**— एकून आपलें मत असें दिसतें कीं, जुगारावर पांच पन्नास हजार रुपये मिळविणारा मनुष्य कांहीं वाईट नव्हे, लबाड नव्हे.!

**जान्सन.**—होय. जुगार खेळणाऱ्या मनुष्यास मी अप्रामाणिक समजत नाहीं. तो मंडळींतला मनुष्य नव्हे; ह्मणजे त्याचे हातून कोणाचा कधीं फायदा व्हावयाचा नाहीं, हें मी देखील कबूल करितों. जुगार ह्या व्यवहारानें एकाजवळचा पैसा दुसऱ्या जवळ जातो. पण तेणेंकरून मध्यंतरीं कोणाचा कांहीं फायदा होत नाहीं. इतर व्यवहारांमध्यें पुष्कळांचें पोट चालतें. आणि पैसा इकडून तिकडे जातांना मध्यें कितीएकांचें हित साधतें.

द्वंद्वयुद्ध हें सशास्त्र आहे किंवा अशास्त्र आहे, असें एके दिवशीं बास्वेलानें जान्सनास पुसिलें. तेव्हां जनरल अगल थार्प हा शूर आणि वृद्ध योद्धा त्याजपाशीं बसला होता. त्यानें जरा दबकावून आणि बास्वेलाकडे तोंड करून ह्मटलें, "मी आधीं तुह्मांलाच विचारतों कीं जर तुमची कोणीं अप्रतिष्ठा केली, तर तुह्मी काय कराल सांगा बरें." मीं उत्तर केलें, "मला त्याशीं भांडणें भाग पडेल."

**गोल्दस्मिथ.**— बरें तर, झाला निकाल. आतां आणखी उत्तर कशाला दिलें पाहिजे.?

**जान्सन.**— नाहीं नाहीं. तेवढ्यावरून निकाल झाला नाहीं. ह्मण विचारिलें, तुह्मी काय कराल, त्यावर त्यांनीं उत्तर दिलें भांडणें भाग पडेल. एवढ्यावरून ते काय करितील हें मात्र कळलें; परंतु, तें सशास्त्र आहे किंवा अशास्त्र आहे, ह्याचा कांहीं निर्णय झाला नाहीं.

**बास्वेल.**— पण मला तें पाहिजे आहे.

**जान्सन.**— अहो, ऐका. मनुष्य जसजसा अधिकाधिक सुधारत जातो, तसतशीं त्यास चिडविण्याचीं साधनें अधिकाधिक वाढतात. आणि त्यांचें महत्त्व इतकें माजतें कीं, त्यांच्या योगानें कधीं कधीं प्राणांशीं गाठी पडतात; आणि त्यांत वास्तविक पाहिलें असतां कांहीं एक नसतें. सुधारलेल्या लोकांस राग येण्यास अगदीं उशीर लागत नाहीं. ही बाह्यात्कारी सुधारणा ज्या लोकांत झाली नाहीं, त्यांतल्या एकाद्या मनुष्यानें जर आपल्या शेजाऱ्यास ह्मटलें कीं तूं खोटें बोलतोस, तर तो त्यास ह्मणेल कीं, तूं खोटें बोलतोस. एवढेंच कायतें. अथवा ह्यानें त्याला एक चापट मारिली, तर तो ह्याला एक मारील. परंतु, सुधारलेल्या लोकांत ह्मटलें ह्मणजे अशा गोष्टी अत्यंत अपमानास्पद मानितात. तेव्हां अर्थात् त्यांस त्यांचा फार राग येतो, आणि त्यांविषयींचा सूड उगवावा, अशी इच्छा त्यांस होते. आणि, अशा प्रकरणांत जो कोणी द्वंद्वयुद्ध करीत नाहीं, त्यास त्याचे लोक जर हिडहिड करीत आहेत, तर त्यानें द्वंद्वयुद्ध केलें पाहिजे. अहो, स्वसंरक्षणार्थ दुसऱ्याशीं लढणें हें कधींही अशास्त्र होत नाहीं. अहो, जो कोणी द्वंद्वयुद्ध करितो, तो आपल्या शत्रूचें हाडवैर मनांत आणूनच केवळ करितो, असें नाहीं; तर, तें तो स्वसंरक्षणार्थ करितो; ह्मणजे, आपणावर जो अयत्न आला आहे, तो जावा, आणि आपणास कोणी हिडहिड करूं नये, ह्मणून तो [illegible]कुत्यास हात घालतो. ज्या सुधारणेच्या योगानें मनुष्य असा एकलीं होतो, ती फाजील सुधारणा न झाली तर बरी. परंतु, जावत्कालपावेतों लोकांची समजूत अशी आहे, तावत्काल-

पर्यंत, योग्य प्रसंगीं मनुष्यानें द्वंद्वयुद्ध करावें, हें सशास्त्र होय.

एकदां मद्यपानाच्या गोष्टी निघाल्या असतां एक मनुष्य असें ह्मणाला कीं, "अहो, मद्यपानाच्या योगानें आपले मनांतली सगळी काळजी नाहींशी होते, आणि समाधानमूलक सगळ्या गोष्टी आपण विसरून जातों, हें आपणांस माहीत आहेच. तर मग, ह्या कारणांवरून, मनुष्यास दारू पिऊं देण्यास काय हरकत आहे.?" त्यास जान्सनानें उत्तर दिलें, "होय, जर तो तुमच्या पंक्तींतला असला, तर कांहीं हरकत नाहीं; कारण, हरकत करून उपयोगीं नाहीं."

गोल्दस्मिथ, जान्सन इत्यादि मंडळी एके समयीं भोजनास बसली असतां, गोल्दस्मिथ ह्यानें असें सांगितलें कीं, लोक जसजसे अधिकाधिक सुख भोगूं लागतात, तसतसे ते अशक्त होत जातात. तें ऐकून जान्सन ह्मणाला, "अहो, पण तुह्मीं ह्मणतां हें मला मुळीं खरेंच वाटत नाहीं. इग्लंदांत सांप्रतकाळीं जितके उंच लोक आहेत, तितके पूर्वी कधींही नव्हते. आणखी, आलीकडची प्रजा अशक्त आणि खुरटी निघाली आहे, असें जरी घटकाभर कबूल केलें, तरी त्यास कारण लोक चैनी होत चालले आहेत हें असावें, असें मला वाटत नाहीं. कारण; एकंदर सर्व राष्ट्रामध्यें चैन करण्यास किती थोड्या लोकांस सांपडते ती पहा. आमचे शिपाई लोक, त्यांस दररोज पांच सात आणे पगार मिळणार; तेवढ्यांत त्यांनीं चैन ती कसली करावी. आणि बहुतेक सर्व लोकांचें असेंच आहे. थोडक्यांतल्या थोडक्यांत जर गरीबांस कधीं चैन करावयास सांपडली, तर तिजपासून, कांहीं हानि न होतां उलटें हित होईल; ह्मणजे ते बळकट होतील, आणि

त्यांचीं कुटुंबें वाढतील. ह्यास्तव, ऐषआरामामुळें सगळ्या राष्ट्राचें असें नुकसान कधींही होणार नाहीं, असें मला वाटतें. कारण, ऐषआराम हा देशांत पुष्कळांस प्राप्त होत नाहीं, फार थोड्यांस मिळतो, असें मीं पूर्वीं सांगितलेंच आहे. देशांत नानाप्रकारचे पुष्कळ कारखाने चालू झाल्यामुळें आणि व्यापार वाढल्यामुळें लोकांतली वीरश्री कमी होते, हें मी कबूल करितों. ह्मणजे, लोकांचें लक्ष्य इतर गोष्टींवरून उडून, ते पैसा मिळविण्याच्या कामास लागतात, आणि त्यांतच भूषण मानितात, असें होतें. शिवाय, कारखान्यांमुळें कितीएक लोकांच्या शरीरांतही इजा होते. ती इतकी कीं, त्यांच्या केवळ शरीराच्या स्थितीवरून, ते कोणत्या प्रकारचा उद्योग करीत असतील, हें चतुर पुरुषांस सांगतां येतें. कितीएक प्रकारच्या व्यवसायांमध्यें, मनुष्यास, इतर अवयवांपेक्षां कोणत्या तरी एकाचा उपयोग अधिक करणें भाग पडतें. असें झालें ह्मणजे मनुष्यामध्यें व्यंग सहजच येतें. पण तें ऐषआरामामुळें नव्हे. शिंपी बसून आसनमांडी घालून काम करितो, पण तो कांहीं ऐषआराम नव्हे."

गोल्दस्मिथ ह्यानें एक नवीन नाटक रचिलें होतें, त्याचा खेळ नाटकगृहांत होणार होता. तो पाहण्यास राजा येणार होता, त्याविषयीं गोष्टी चालल्या असतां—

**गोल्दस्मिथ.**— होय, सरकारची स्वारी येईल तर बरें होईल.— ( निरपेक्षपणाचा बाणा दाखवून. ) तरी, त्यापासून माझें इतकें देखील कांहीं हित व्हावयाचें नाहीं.

**जान्सन.**— ( हंसून ) अहो, तुमचें नाहीं, पण त्याचें तर खरें! अहो, ह्या निरपेक्षपणाच्या ढोंगांत कांहीं अर्थ

नाहीं. अहो, सांप्रतच्या स्थितीमध्यें अधिकाऱ्यास खूष करण्यास झटणार नाहीं कोण.?

एके वेळीं मंडळी बसली असतां—

**बास्वेल.**— ओटाहिटी येथील लोकांस भाकरीचीं झाडें प्राप्त आहेत, ह्मणजे त्यांस एका झाडाचीं फळें भाकऱ्यांप्रमाणें आयतीं उपयोगीं पडतात, ह्मणून ते, आपल्या भाकर करण्याच्या श्रमाच्या रीतीस फार हंसतात.—नांगरणें, पेरणें, वेणणें, कापणें, मळणें, दळणें, भाजणें इत्यादि गोष्टींचें त्यांना मोठें नवल वाटतें.

**जान्सन.**— ठीकच आहे. सुधारलेल्या लोकांच्या सुखाच्या गोष्टी सांगितल्या असतां, रानटी लोकं हंसावयाचेच. जे लोक घरांवांचून राहतात, त्यांस जर तुह्मी सांगूं लागलां कीं, आह्मी विटांवर विटा ठेवून अशा भिंती बांधितों, वांशाला वांसा बांधून अशीं पांखीं करितों, आणि त्या कामांत परांच्यांवरून लोक खालीं पडून त्यांचे हातपायही कधीं कधीं मोडतात; तर अशा घर बांधण्याच्या रीतीची ते अगदीं टर करून सोडितील. ! तथापि, ज्यांस घरें आहेत त्यांपेक्षां ज्यांस घरें नाहींत ते सुखी आहेत, असें ह्मणतां येत नाहीं. झाडास आलेल्या भाकरीपेक्षां ही आपली भाकर खचीत पुष्कळ चांगली आहे.

इ० स० १७७४ त जान्सन हिब्रिदीज वगैरे पाहण्याकरितां प्रवासास निघाला. तो तिकडे पुष्कळ फिरला. त्याच्या प्रवासाच्या वर्णनाचें वेगळेंच पुस्तक आहे. तें फार मनोरंजक आहे. तो लंदनास परत आल्यावर, तारीख २१ मार्च सन १७७५ इ० रोजीं बास्वेलही स्कात्लंदांतून लंदनास परत आला.

जे न्यायाधीश हिंदुस्थानांत जातात, त्यांनीं तेथें व्यापार करून पैसा मिळविल्यास काय चिंता आहे, असें बोलणें निघालें. तेव्हां,—

**जान्सन.**— अहो, भलभलते इतर लोक जर पाहिजे तितकी संपत्ति मिळवीत आहेत, तर मग न्यायाधीशांनींच कां न मिळवावी.?

**बास्वेल.**— पण त्यांना पगार चांगले मोठे असल्यावर त्यांचें लक्ष्य सरकारीं कामें सोडून दुसरे गोष्टींकडे कशाल लागेल?

**जान्सन.**— कोणत्याही न्यायाधीशाच्यानें आपलें सगळें लक्ष्य सरकारी कामाकडे देववणार नाहीं. आणि, सरकारी काम केल्यावर जो कांहीं वेळ त्यास रिकामा सांपडेल, तो त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें आपल्या फायद्याकडे लावावा, हें अगदीं योग्य आहे.

**देव्हिस.**— तर मग न्यायाधीशानें विमेदार सुद्धां व्हावें एकूण.! आणि तो कचेरीस जात असला ह्मणजे त्यास वाटेंत एकाद्यानें उभें करून सांगावें कीं, अहो, जरा दम खा, हीं पांच चार गलबतें निघालीं आहेत, एवढ्यांचा विमा ठरवून घ्या आणि मग जा.!

**जान्सन.**— वाः! तुह्मी उद्यां ह्मणाल कीं न्यायाधीशास घर सुद्धां नसावें. कां कीं तो कचेरींत जात असतां जर त्यास कोणीं सांगितलें कीं, तुमच्या घरास आग लागली, तर, तो, सरकारी काम एकीकडे ठेवून घर विझावि-ण्याचें यंत्र जलद नेण्याच्या कामांत गुंतेल.! असें पाहूं लागलों तर हें कधींच संपावयाचें नाहीं. ज्या न्यायाधीशाकडे जमीन असते, तो, साक्षात् नाहीं, तरी परंपरेनें

धान्याचा, गुरांचा वगैरे व्यापार करतो, असें समजलें पाहिजे; एवढेंच नव्हे, तर तो जमिनीचा व्यापार करतो, असें ह्मटलें तरी चालेल. करमणुकीकरितां न्यायाधीश सोंगटीं गंजिफा खेळत असला, तर तो मोठा दोषी होणार नाहीं. सारांश, सगळें लक्ष एका विषयाकडे असें कधीं कोणाच्यानेंही देववणार नाहीं. एकाद्या कामाकडे आपलें लक्ष्य किती असतें, ह्याचा जर हिशेब पाहूं लागलों, तर खचीत चमत्कार वाटेल. मी नुसतें न्याय करीत बसेन, दुसरें कांहीं करणार नाहीं, अशा करारावर न्यायाधीशाची जागा कोणीही पतकरणार नाहीं.

**बास्वेल.**— सर्वमान्य न्यायाधीश हेल हा आपल्या हुद्याच्या कामाशिवाय दुसरें कांहीं करीत नसे.

**जान्सन.**— अहो तो देखील इतर पुष्कळ गोष्टींकडे लक्ष देत असे. उगाचका त्यानें एवढी मोठी जिनगी करून ठेविली आहे ती.!

तो इ० स० १७७५ त थ्रेल ह्याजबरोबर फ्रान्स देश पहावयास गेला होता. तो परत आल्यावर एके दिवशीं मंडळींत ह्मणाला, "फ्रान्स देशामध्यें बडे लोक ऐषआरामांत राहातात, आणि इतर लोक अतिशयित विपत्ति भोगितात. इंग्लंदांत मध्यम प्रतीचे लोक सुख भोगितात, तसा प्रकार फ्रान्सामध्यें मुळींच नाहीं. पारिस राजधानींतलीं दुकानें अगदीं भिकार आहेत. इंग्लंदांतल्या तुरुंगांत ज्या प्रकारचें अन्न पाठवितात, त्या प्रकारचें अन्न तेथें बाजारांत विकावयास मांडितात. हवा खेरीज करून फ्रान्स देश स्कातूलंदापेक्षां फार वाईट आहे. फ्रान्स देशामध्यें परमेश्वरानें पुष्कळ सुखोत्पादक वस्तु निर्माण करून ठेविल्या

आहेत; पण तेथल्या लोकांनीं जसा करावा तसा उद्योग न केल्यामुळें त्यांपासून सुख प्राप्त होत नाहीं. ह्या उद्योगसंबंधानें पाहिलें तर त्या लोकांपेक्षां स्कातूलंदचे लोक बरे."

जान्सनाचा पोषाक फार साधा असे. त्याचें फ्रेंच लोकांस मोठें नवल वाटे. त्या लोकांपैकीं एक मनुष्य एके दिवशीं त्यास ह्मणाला, "आपण फ्रेंच नाटकगृहांतले उत्तम नाटककारांचे पोषाक अझून कधीं पाहिले नाहींत वाटतें.!"

**जान्सन.**— काय.? नाटककारांचे पोषाक होय.? मीं पुष्कळ पाहिले आहेत.! पण अहो, नाचणाऱ्या कुतऱ्यांप्रमाणें जशीं कांहीं चित्रें मेजांवर मांडितात, आणि त्यांचीं वेढींवांकडीं तोंडें केलेलीं पाहून हंसायास येतें, त्यांहून अधिक मी नाटककारांस समजत नाहीं.

**मनुष्य.**— पण कांहीं नाटककार इतरांपेक्षां पुष्कळ चांगले असतात, असें आपणांस वाटत नाहीं काय.?

**जान्सन.**— होय. पण कितीएक कुत्रेसुद्धां इतर कुत्र्यांपेक्षां चांगले नाचत नाहींत काय.?

दाक्तर बर्नी ह्यांजपाशीं बोलत असतां जान्सन ह्मणाला, "मुलें प्रौढ होण्यापूर्वीं त्यांस शाहणीं करण्यास झटणें, हें केवळ व्यर्थ होय. समजा कीं मुलगा पांच सहा वर्षांचा असतांच त्याला पुष्कळ ज्ञान प्राप्त झालें. तर, त्याचा कांहीं उपयोग आहे काय.? त्याचा ज्या वेळीं योग्य उपयोग व्हावयाचा, ती वेळ प्राप्त होण्यापूर्वींच, कदाचित्, तें तो विसरून जाईल, आणि शिक्षकाचा वेळ व श्रम हे सर्व फुकट गेले असें होईल. फळ जितकें लवकर पिकेल तितकें चांगलें, असें वाटतें खरें; परंतु तें अकाळीं लवकर पक्व झाल्यानें फायदा न होतां उलटी हानि होते."

जाहाजांवरच्या नौकऱ्यांविषयीं गोष्टी निघाल्या असतां जान्सन ह्मणाला, "जाहाज हें तुरुंगापेक्षांसुद्धां वाईट आहे. जाहाजावरच्यापेक्षां तुरुंगांमध्यें हवा, मंडळी, आणि सर्व प्रकारच्या सोई हीं फार चांगलीं असतात. मनुष्यास जमिनीवर थारा नाहींसा झाला ह्मणजे तो जाहाजाचा मार्ग धरितो."

**बास्वेल.**— तर मग बापानें मुलास जाहाजावरचें काम करण्यात शिकविणें हें मोठें निर्दयपणाचें काम आहे काय.?

**जान्सन.**— होय. ज्या बापाचें मन माझ्यासारखें असेल, त्यास हें खरेंच निर्दयपणाचें कृत्य होय. समुद्रांतलीं दुःखें माहीत नसल्यामुळें प्रथम मनुष्य जाहाजावरचें काम पतकारितो. आणि तें एकदा गळ्यांत पडलें, ह्मणजे तें सुटत नाहीं. ह्याच एका कामाचें काय.? पण दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचें पाहिलें तर असेंच आहे.

एक वैद्य होता; त्यानें वारंवार धर्मांतर केल्यामुळें त्याचा धंदा चालेनासा झाला, असें कोणीं सांगितलें. तें ऐकून बास्वेल ह्मणाला, धर्माशीं आणि वैद्यकीशीं संबंध काय आहे.? त्यास जान्सनानें उत्तर दिलें, "अहो, संबंध आहे तर.? पहा, जी गोष्ट सर्वांस श्रुत आहे, तिजविषयीं जर मनुष्य वेडेपणानें वागत आहे असें लोक पाहात आहेत, तर जी गोष्ट त्यांस कळत नाहीं, तिजविषयींही तो तशा विलक्षणपणानेंच वागेल, असा संशय त्यांनीं कां न घ्यावा बरें.? एक मोठा चांगला वैद्य आहे; आणि जर तो घोड्याचें मास खाऊं लागेल, तर त्याजकडे कोणी जाणार नाहीं, किंवा त्याला कोणीं बोलावणार नाहीं. त-

थापि, घोड्याचें मास खाऊन ह्मणजे चांगली वैद्यकी कर-तां येणार नाहीं, असें नाहीं. मनुष्याचा मूळचा धर्म जर वाईट असला, आणि तो त्यास धरून राहिला, तर तो त्याच्या धंद्याच्या आड इतका यावयाचा नाहीं. परंतु, तोच बदलला, तर मोठी हानि होईल."

दुसऱ्या एका वैद्याविषयीं गोष्टी निघाल्या असतां, दाक्तर तेलर ह्मणाला, "तो कोणाला चांगला वाटत नाहीं, ह्मणून कितीएक लोकांशीं भांडून मीं त्याजविषयीं त्यांची खातरी केली आहे." जान्सनानें त्यास सांगितलें, "अहो, पण तुह्मी पक्कें समजा कीं, अशी लोकांची खातरी केल्यानें त्या वैद्याचा कांहीं नफा तर व्हावयाचा नाहींच, पण उलटें नुकसान मात्र होईल. कसें तें पहा. ज्याची ज्याची ह्मणून तुह्मीं खातरी केली असेल, त्या त्या मनुष्यास तुमचा खचीत राग आला असेल; आणि त्या वैद्यास कधींही बोलावावयाचें नाहीं असा त्यानें निश्चय केला असेल. ह्या तुमच्या भांडणांत जर त्या लोकांचें ह्मणणें खरें ठरलें असतें, तर मात्र कदाचित् त्या वैद्याचा फायदा झाला असता. ह्मणजे, ते हट्टास न पेटते तर, अमुक तमुक वैद्य, मग तो कसाही असो, त्याला बोलावा तर खरें, असें त्यांचे तोंडांतून कधीं एकदां तरी निघालें असतें."

एका न्यायाधीशानें एका खटल्यामध्यें अगदीं अन्यायाचा ठराव केला होता. त्याविषयीं कोणीएकानें एक पुस्तक छापलें होतें. त्याविषयीं गोष्टी चालल्या असतां जान्सन् बोलला, "अहो, ह्या पुस्तकापासून न्यायाधीशास तिळभर देखील वाईट वाटावयाचें नाहीं. कारण, हें कृत्य त्यानें आपल्या अकलेप्रमाणें, इमानें इतबारें, देवाला स्मरू-

न केलें असलें पाहिजे; अथवा, बुद्ध्या अन्याय केला असला पाहिजे. आतां, जर हें कृत्य त्यानें सत्य स्मरून यथातथ्य केलें असलें, तर त्याची मनदेवताच त्याचें रक्षण करील; ह्मणजे, मला जें न्याय्य दिसलें तें मीं केलें आहे, लोक कांहीं ह्मणोत, असें समजून तो स्वस्थ राहील. आणि जर त्यानें बुद्ध्या अन्याय केला असला, तर चाबूक मारला तो खूब लागला, असें त्याच्या मनास वाटून त्याला संतोष होईल. एकंदरींत, ह्या पुस्तकापासून त्याला कांहीं वाईट वाटावयाचें नाहीं."

ह्या गोष्टी इ० स० १७७६ पर्यंत झाल्या. त्या वेळीं ज़ान्सनाचें वय सुमारें ६७ वर्षांचें होतें. आतां हा लेख बराच लांबला, ह्मणून येथें पुरा करितों.

---

## भाग तिसरा.

एके वेळीं लग्नांच्या गोष्टी निघाल्या होत्या. तेव्हां बास्वेल ह्मणाला, "श्रीमंत बायकोशीं लग्न करण्यापेक्षां गरीब बायकोशीं लग्न करणें बरें. कारण, श्रीमंत बायको जरी पुष्कळ द्रव्य घेऊन घराला आली, तरी तिचा खर्चही तसाच असावयाचा, आणि जी गरीब असते, तिचा खर्चाकडे हात अगदीं बेताबाताचा असतो." तें ऐकून जान्सन बोलला, "ही गोष्ट अगदीं खोटी आहे. श्रीमंत बायको पैशांत रुळलेली असते. ती पैसा मोठ्या व्यवस्थेनें खरचिते. पण, ज्या बायकोपाशीं पूर्वीं कांहीं नसून लग्न झाल्याबरोबर हातांत पैसा खेळूं लागतो, तिला मात्र खर्चाचा सुमार राहात नाहीं. ती पाहिजे तसा उधळेपणा करिते."

तारीख २८ वी माहे मार्च स० १७७६, रोजीं इक-

डच्या तिकडच्या गप्पा चालल्या असतां वास्केल ह्मणाला, "माझी मुलेंमाणसें फार दूर आहेत तीं दुखणाईत तर नसतील ना, असा संशय उत्पन्न होऊन मला कांहीं सुचेनासें होतें. काय करावें.?" त्याजकडे तोंड करून जान्सनानें उत्तर केलें, "अहो, तुह्मीं आजारी आहांत कीं काय, अशा संशयानें भिऊन जर तुमचीं माणसें दुःख करूं लागलीं, तर तुह्मीं त्यांस मूर्ख समजणार नाहीं काय. ?"

मरे ह्मणून एक जान्सनाचा स्नेही होता. तो एके वेळीं बोलला कीं, "प्राचीनकाळचे तत्त्वज्ञानी जरी वेगवेगळ्या पंथांचे होते, तरी ते एकमेकांशीं वादविवाद ह्मटला ह्मणजे मोठ्या आनंदानें आणि मोकळ्या मनानें करीत असत." तें ऐकून जान्सनानें उत्तर दिलें, "होय, तें खरें. पण ह्याचें कारण असें आहे कीं, ते आपल्या धर्मांविषयीं दुराग्रह धरीत नसत. अहो, ज्या गोष्टीवर आपला पूर्ण विश्वास बसला आहे, तिचें खंडन जो कोणी करूं लागेल, त्याचा आपणास राग येतो, ह्यांत कांहीं विशेष नाहीं; कां कीं तें स्वाभाविकच आहे. मनुष्य कांहीं कारणांनीं एकादी गोष्ट निर्विवाद खरी समजतो; तिजवर त्याचा विश्वास बसतो; तो इतका कीं तेणेंकरून त्याचे चित्तास एक प्रकारचें स्वास्थ्यसुख प्राप्त होतें. अशा स्थितींत, ती गोष्ट खोटी आहे, असें जर कोणी सिद्ध करूं लागला, तर, सहजच, तिजवरचा त्याचा विश्वास कमी होऊं लागतो; तेव्हां अर्थात्, तन्मूलक स्वास्थ्यसुखासही न्यूनता येते. मग त्या मनुष्याचा राग त्यास कसा नाहीं येणार बरें. ? तुमच्या शास्त्रांत अमुक गोष्ट सांगितली आहे ती खरी नाहीं, असें जर कोणा धर्मभोळ्या लोकांस तुह्मीं सांगितलें, तर त्यांस

खचीत राग येईल. कारण, ज्या आधारावर टेकून त्यांचीं मनें स्वस्थ असतात, तो आधार तुम्ही हालविला असें झालें."

**मरे.**— जी गोष्ट सत्य आणि हितोत्पादक अशी आपणांस माहीत आहे, तिला जर कोणी असत्य आणि वाईट ह्मणूं लागेल, तर अशा मनुष्याचा आपणास राग येऊं नये, तर, त्याची अज्ञानावस्था पाहून दया यावी हें योग्य आहे, असें मला वाटतें.

**जान्सन.**— जी चांगली आणि हितोत्पादक गोष्ट आपणांस माहीत असेल, ती लोकांस कळविणें हें लोकांच्या हितांचें व अत्यंत स्तुत्य कृत्य होय. त्यांत केवळ परहित बुद्धि आहे, ह्यांत संशय नाहीं. पण ही बुद्धि केवळ तुमच्या अंतःकरणांत मात्र. ज्यास तुह्मी ती गोष्ट सांगतां, त्यास जर तुमची बुद्धि अशी आहे, असें वाटत नाहीं, तर काय उपयोग.? असें समजा कीं, हातांत काठी घेऊन एक वेडा मनुष्य आतां येथें आला, तर त्याचें मन असें अव्यवस्थित झालें आहे, ह्या गोष्टीवरून त्याजविषयीं आपलें चित्त कळवळावें हें योग्य आहे. पण आपण प्रथम काय करूं.? आपण प्रथम त्याच्या हातांतली काठी घेऊन त्यास आधीं बांधून ठेवूं, आणि मग त्याचा कळवळा करीत बसूं.! ह्मणजे तात्पर्य इतकेंच कीं, आधीं स्वसंरक्षण आणि मग पुढें इतर गोष्टी ! ज्या वादविवादापासून आपलें कोणत्याही प्रकारें अहित होण्याची भीति नाहीं, त्या वादविवादापासून मनुष्याला राग यावयाचा नाहीं. कोणा निर्दाइता-चा मुलगा फांशीं जाईल कीं काय, ह्याविषयीं मी आधीं शांत चित्तानें पाहिजे तितकें बोलेन. परंतु जर दुसरा मनुष्य माझा मुलगा फांशीं जाण्याविषयीं खातरीच्या गोष्टी

सांगूं लागेल, तर त्या माझ्यानें ऐकवणार नाहींत. मला चैन पडणार नाहीं. मला वाईट वाटेल.

**बास्वेल.**— होय, खरें आहे. पहा, माझी वायको चांगली प्रामाणिक आणि पतिव्रता आहे असें मी समजतों, आणि तिजवर अत्यंत लोभ करितों. तेणेंकरून मला सुख होतें. असें असतां, ती चांगली नाहीं, अप्रामाणिक आहे, दुराचारी आहे, असें माझ्या मनांत भरविण्याचा जर कोणी प्रयत्न करील, तर त्याचा मला खचीत राग येईल. कारण, त्याच्या सांगण्यावरून माझ्या सुखास व्यत्यय येण्याची भीति माझे मनांत उत्पन्न होईल.

**मरे.**— अशा व्यर्थ भीतींत काय आहे.? खरें तें खरें. खऱ्याला कधीं मरण नाहीं.

**जान्सन.**— होय. तें खरें. पण, जें खरें आहे तें खरें असें स्थापित करण्यास देखील फार त्रास पडतो. अहो, तुह्मी खरोखर निरापराधी असतां, दर आठवड्यास तुह्मांवर कोणतातरी एक आरोप आणून तुह्मांला जर न्यायाधीशापुढें उभें केलें, तर प्रत्येक प्रसंगीं, मी निरपराधी आहे असें सिद्ध करून दाखविणें तुह्मांस आवडेल काय.!

दुसरे एके प्रसंगीं जान्सनास—

**बास्वेल.**— अहो, अशी कल्पना करा कीं, कोणीएक चांगला गृहस्थ आहे; त्याच्या मुलीस कोणी लबाडानें नादीं लाविल्यामुळें तिचें पाऊल अमार्गांत पडलें आहे; पण तें बाहेर कोणास ठाऊक नाहीं; अशा मुलीस त्यानें आपल्या घरांत राहूं द्यावें काय? अथवा त्यानें तिला घरांत राहूं दिल्यास तो लोकांस फसविण्यास कारणीभूत झाला, असें होईल.कीं नाहीं? ह्मणजे असें कीं, जर

तो ही खरी हकीकत न सांगेल, तर एकादा थोर परंतु गैरमाहीत मनुष्य तिशीं लग्न लावील.

**जान्सन.**— बाप फसविण्यास कारणीभूत होईल, असें वाटत नाहीं. कारण, त्याची मुलगी त्याच्या घरांत आहे, आणि जर तिशीं कोणीं लग्न लाविलें, तर ती गोष्ट प्रारब्धानुरूप घडून आली असें ह्मटलें पाहिजे. परंतु, त्या बापास त्याचा कोणी मित्र जर तिशीं लग्न करूं का ह्मणून विचारील, तर त्यानें, कांहींएक कारण न कळवितां नुसतें नको ह्मणून सांगावें. अथवा, त्याला दुसऱ्या मुली असून जर ही गोष्ट त्यांस ठाऊक असली, तर अशी मुलगी घरांत न राहूं देणें हा उत्तम पक्ष होय. पहा. आपली स्थिति अशी आहे.— आपण जसे आपल्या अब्रूस जपतों, तसें आपण लोकांच्या अब्रूसही जपावें; तिजविषयीं भलतेच विचार मनांत आणितां कामास नये; मनुष्यानें आपल्या अंगचे अथवा आपल्या मुलीच्या अंगचे दुर्गुण आपण होऊन लोकांस न सांगितले, तर ह्मणजे तो अप्रामाणिक अथवा बेअब्रूचा गृहस्थ झाला, असें नाहीं; एकाद्या मनुष्यानें आपल्या मित्राच्या मुलीस बिघडविलें असलें, तर, "संभाळा हो, मला आपल्या घरांत येऊं देऊं नका, मीं एका मित्राच्या मुलीस बिघडविलें आहे, तसें कदाचित् तुमच्या मुलींस बिघडवीन," असें सर्व लोकांत ओरडत फिरलें पाहिजे असें नाहीं.

ग्रंथावलोकन हा ज्ञानप्राप्तीचा एक अत्युत्तम मार्ग होय. त्याविषयीं जान्सनानें एके वेळीं असें ह्मटलें कीं, "जें मनुष्यास आवडतें, तें वाचिलें असतां, तें मनावर चांगलें ठसतें. जें आवडत नाहीं, तें वाचावयास लागलें असतां अर्धें

लक्ष त्या विषयाकडे चित्त लाविण्याचे कामीं गुंततें; तेव्हां अर्थात् राहिलेलें अर्धें मात्र विषयग्रहणाकडे लागतें." आणखी तो असें ह्मणाला कीं, "जर कोणी मनुष्य एकादें पुस्तक मधूनच वाचूं लागेल, आणि तें त्याला आवडेल, तर, त्यानें तें पहिल्यापासून वाचावयाच्या भरीस पडून आरंभिलेलें वाचणें सोडूं नये; कां कीं, पहिल्यापासून वाचायास लागलें असतां कदाचित् त्यावरचें त्याचें मन मुळींच उडेल."

एके वेळीं कोणी गृहस्थ जान्सनापाशीं बसला होता; तो ह्मणाला, "नास्तिकापेक्षां क्रूर-कर्म करणारा मनुष्य फार भयंकर होय." त्यावर जान्सनानें उत्तर केलें, "नाहीं; तुह्मी ह्मणतां तें मला अगदीं कबूल नाहीं. अहो, जो नास्तिक बनला तो करणार नाहीं काय.? त्याला सुचलें मात्र पाहिजे.!"

बास्वेलानें जान्सनास असें सांगितलें कीं, मीं एके ठिकाणीं मेजवानीस गेलों होतों, तेथें बेत फार उत्तम होता. परंतु, जमलेल्या मंडळींत लक्षांत ठेवण्यासारखें एक देखील कोणीं भाषण केलें नाहीं. त्यास जान्सनानें उत्तर दिलें, "अहो, बोलणें फार झालें नाहीं तें बरेंच. एकत्र जमून खावें, प्यावें, येणेंकरून स्नेह वृद्धिंगत होतो, आणि ममता वाढते. ह्या गोष्टीस बोलणें चालणें जितकें कमी होईल तितकें बरें. कारण, बोलणें चाललें ह्मणजे, एकाद्या गोष्टीविषयीं भिन्न भिन्न मतें पडून वाद उद्भवतो. अथवा, गप्पा चालल्या ह्मणजे, ज्या कोणांस वाचाळता करायास नको, त्यांस स्वस्थ बसावें लागतें, आणि

तेणेंकरून त्यांस थोडें वाईट वाटतें. एकंदरींत, अशा मंडळींत फार बोलणें चांगलें नव्हे."

भोजनाच्या वेळीं कोणीं असें सांगितलें कीं, आलीकडे लंदन शहरामध्यें लोकांचा विलास फार वाढत चालला आहे, खाण्याच्या पदार्थांची महागाई होत चालली आहे, आणि नवनवीं घरें बांधण्याचाही सपाटा चालला आहे. तें ऐकून जान्सन ह्मणाला, "होय. तें खरें आहे. भाड्याचा दर कमी होईपर्यंत लोक अशींच घरें बांधीत जातील. परंतु, धान्य जितकें आतां विपुल आहे, तितकें पूर्वीं कधींही नव्हतें."

जान्सन एके दिवशीं रात्रीं स्त्रीतहाम येथें जावयास निघाला. त्यास—

तेलर.— अहो तुह्मी असे रात्रीं जाल तर तुह्मांला चोर लुटतील; अथवा, चोर तुमचे जवळ आल्याबरोबर, तुह्मीं त्याला गोळी घालून मारलें पाहिजे. आपणावर जर असा प्रसंग आला, तर बुवा आपणास कोणी लुटलेलें पुरवलें; पण गोळी घालून आपण कोणाला मारणार नाहीं.

**जान्सन.**— आपण तर बुवा असें नाहीं करणार; मला लुटायाला जर चोर आलाच, तर मी त्याला तत्क्षणींच गोळी घालून ठार मारीन. आधीं लुटूं द्यावें, आणि मग अधिकाऱ्यांपुढें आणाशपता वाहून चोरास मारवावें, हें मला बरें वाटत नाहीं. शपत वाहतांना, मनुष्य अमकाच किंवा दुसरा ह्याचा संशय पडेल कदाचित्, आणि त्यांत चूकही होईल; परंतु, तेव्हांच्या तेव्हां जागचे जागीं मारिल्यानें अशी चूक व्हावयाची शंका सुद्धां नाहीं. ह्मणून हा पक्ष मला बरा दिसतो.

जान्सन आणि वास्वेल हे गोष्टी सांगत बसले असतां, कोणी तिसरा गृहस्थ तेथें येऊन बसला. त्यानें जान्सनास प्रश्नावर प्रश्न केले. "आपण काय केलें.? आपण काय ह्मटलें.?" असें विचारून विचारून त्यानें त्यास अगदीं त्रासवून सोडिलें. तेव्हां जरा रागावून त्यास जान्सन ह्मणाला, "असे प्रश्न मला अगदीं आवडत नाहींत. असें विचारीत सुटणें हें प्रतिष्ठित मनुष्यास शोभत नाहीं, हें तुह्मांला ठाऊक नाहीं काय.? कां आणि काय ह्यांनीं मला त्रासवूं नका. हें काय.? गाईचें शेंपूट लांब कां? कोल्ह्याचें शेंपूट केसाळ कां.? हा काय ताप.!" तो गृहस्थ, जरा लाजून बोलला, "अहो महाराज, आपण इतके चांगले अहां, ह्मणूनच मला आपणांस इतकें विचारण्यास धैर्य झालें; नाहीं तर होतें ना." जान्सनानें उत्तर दिलें, "अहो, मी इतका चांगला आहें, एवढ्या कारणावरून तुह्मी इतके वाईट व्हावें, असें नाहीं."

वास्वेल आणि जान्सन हे दोघे एके दिवशीं दाक्तर पर्सी ह्याजकडे भोजनास गेले होते. तेथें, गोल्दस्मिथ ह्या नामांकित ग्रंथकाराची गोष्ट निघाली. तेव्हां जान्सन ह्मणाला, "गोल्दस्मिथ हा फार मत्सरी होता." त्यास वास्वेलानें उत्तर दिलें कीं, "ही गोष्ट तो स्वतः आपल्या तोंडानें कबूल करीत असे." त्यावर जान्सनानें ह्मटलें, "बरें, तुह्मीं तर हालवून खुंटा बळकट केला.! अहो, त्याचे ठायीं मत्सर इतका होता कीं, तो त्याला दडवितां सुद्धां येईना. त्याचें अंतःकरण त्यानें इतकें कांठोकांठ भरलें होतें कीं, त्याचा प्रवाह वरून चालला असे. तो मत्सराविषयीं वारंवार पुष्कळ बोलत असे, ही गोष्ट खरी आहे. अहो, जी गोष्ट

मनुष्य आपल्ले अंगीं आहे ह्मणून कबूल कारितो, त्या गोष्टीचा विचार करण्यास त्यास कांहीं लाज वाटत नाहीं; तथापि, ज्या गोष्टी मनांत घोळत असतात, त्या उघड कबूल करण्यास मनुष्याला लाज वाटते. आपण सर्व स्वभावतःच मत्सरी अहों; पण तो मत्सर आपण दाबितों, ह्मणून त्यापासून आपणांस बाधा होत नाहीं. स्वभावतः ह्मटलें असतां आपण सर्व चोरें[1] आहों. पहा. एकादी वस्तु दृष्टीस पडली, तर ती ज्या उपायानें लवकर प्राप्त होईल, तो उपाय लहान मूल सुद्धां शोधीत असतें. परंतु, मनास बोध कारितां कारितां आणि त्याप्रमाणें संवय लावतां लावतां हे दुर्गुण नाहींतसे होतात. ते इतके कीं, दुसऱ्याची वस्तु घ्यावी, असें त्यांच्या मनांत देखील येईनासें होतें. अशी स्थिति होईतोंपर्यंत मनुष्याच्या अंतःकरणांत वासना आणि सदसद्विचारशक्ति ह्यांचें युद्ध चाललेलें असतें."

स्त्रियांची स्वतंत्रता हा विषय एकदा निघाला होता. तेव्हां मिसेस नालीस ह्मणून एक स्त्री होती ती ह्मणाली, कीं "स्त्रियांपेक्षां पुरुषांस स्वतंत्रता फार आहे." त्यावर—

**जान्सन.**—अहो बाई, असें कां बरें ह्मणतां.? स्त्रियांना स्वतंत्रता जितकी असावी तितकी आहेच; पुरुषांस मोठमोठीं जोखमीचीं आणि श्रमांचीं कामें करावीं लागतात, आणि बायकांस स्वस्थ बसून खावयास सांपडतें. पहा. पुरुष

---

१ ही गोष्ट बोलायाला फार कठीण वाटते. तथापि ती अगदी खरी आहे व्यवहार पहा. एका घरामध्यें कोणी परके मनुष्य नसलें तरी. बापलेक भाऊ भाऊ, मायलेंकरें, सासवासुना, नंनदाजावा. यांचीं पेट्या कुलपें वेगळीं असतात ! त्यावरून तीं एकमेकांस चोर समजतात, असें नाहीं का झालें. !

जलप्रवासाचीं संकटें भोगितो, घरें बांधितो, ही सगळी दगदग केवळ बायकोच्या सुखाकरितां, दुसरें कांहीं नाहीं.

**नालीस.**— आपण एवढाल्या गोष्टी सांगतां खऱ्या; पण त्यांपासून कांहीं मनाची खातरी होत नाहीं. पहा. एका गवंड्याचेंच उदाहरण घ्या. त्याची बायको एकदां दारू पिऊन असावध झाली होती असें लोकांस समजलें पुरे, ह्मणजे, तिजविषयीं बभ्रा होऊन ती बुडालीच समजा. पण तोच तिचा नवरा, दारू पिऊन शेंकडो वेळां झिंगला, तरी त्याची अब्रू कमी झाली असें कोणाला वाटत नाहीं. इतकेंच काय. पण इकडे त्याचीं बायकामुलें उपाशीं मेलीं तरी चालतात. ! !

**जान्सन.**— अहो बाई; तुह्मी थोडा विचार करा. तो गवंडी झिंगो किंवा त्याचें कांहीं होवो. त्याचीं बायकामुलें उपाशीं मरूं लागलीं कीं, त्यांच्या निर्वाहाविषयीं सरकार त्याचा लगेच जामीन घेतें. आणखी सांप्रतच्या स्थितींत स्त्रियांचा दुसरा एक फायदा आहे. तो हा कीं, त्यांस वाईट मनुष्यांच्या मंडळींत जाण्याची गरज नाहीं. तसें पुरुषांचे चालत नाहीं. त्यांस कामधंद्यासाठीं सर्व प्रकारच्या लोकांशीं संबंध ठेवावा लागतो.

**नालीस.**— अहो महाराज, तुह्मी ह्मणतां तें सगळें खरें. तथापि, बायकांपेक्षां पुरुषांस स्वतंत्रता अधिक मिळालेली आहे, हें चांगलें नाहीं, असें माझ्या मनांत आल्यावांचून राहात नाहीं. आणि ह्या स्वतंत्रतेच्या योगानें पुरुषांस मोठें वर्चस्व प्राप्त झालें आहे. हें त्यांनाच कां असावें? आह्मां स्त्रियांस कां असूं नये बरें. ?

**जान्सन.**— अहो, बाई, स्त्रिया किंवा पुरुष ह्या दोहों

पैकीं कोणाएकास तरी वर्चस्व मिळालेंच पाहिजे. आपला प्रख्यात कवि शेक्सपियर ह्यानें एकेठिकाणीं ह्मटलेंच आहे कीं, "जर दोन असामी घोड्यावर सवले, तर त्यांतला कोणी तरी एक मागें असावयाचाच."

**दिलि.**—( ह्मणून एक गृहस्थ )–अहो, ह्यांचें ह्मणणें मला वाटतें असें कीं, घोड्यावर दोन टोपल्यांच्या माकणींत दोहों बाजूंस दोन मनुष्यें बसविलीं, ह्मणजे मागें पुढें कोणी नाहीं. होय. ?

**जान्सन.**— मग तर घोडा दोघांनाही एकदम फेंकून देईल. !

**नालीस.**— स्वर्गलोकीं तरी स्त्रीपुरुषांची बरोबरी होईल, अशी मला आशा आहे.

**बास्वेल.**— बाईसाहेब, आपण आतां फार दूर गेलां.! स्वर्गलोकीं नुसती स्त्रीपुरुषंचीच कां, देवदूतांची आणि आपली सर्वांची बरोबरी होईल, असें कां मग ह्मणानां. स्वर्गलोकीं आपण सर्व सुखी होऊं, हें कदाचित् खरें असेल. परंतु, सर्व एकसारखीं सुखी होऊं, असें ह्मणतां येत नाहीं. मनुष्यें आपापल्या योग्यतानुसार सुखी झालीं ह्मणजे बस आहे. एकादा चांगला गाडीवान आणि सर ऐझाक न्यूतन ह्या दोघांस ही स्वर्गलोकीं सुख होईल. परंतु, सुखाचें प्रमाण कमजास्त राहील, एकसारखें राहाणार नाहीं.

**जान्सन.**— हो, प्रमाण बहुधा एकसारखें राहणार नाहीं, असें वाटतें.

ऐष आरामांत रहणें हें चांगलें आहे, असें जान्सनाचें मत असे. त्याविषयीं गोष्टी चालल्या असतां तो एकदा ह्मणाला, "तुह्मी जो पैसा ऐष आरामांत खरचितां, त्यापा-

सून गरीबांचें हित झाल्यावांचून राहत नाहीं. भिक्षेप्रमाणें गरीबांस पैसा वांटिला तर ते खचीत आळशी होतील. परंतु, ऐष आरामाकरितां कांहीं वस्तु तयार करवून, त्या आपण विकत घेऊन, तद्द्वारा गरीबांस पैसा दिला असतां, ते अधिक उद्योगी होतील. अशा प्रकारें गरीबांस पैसा पोंचविण्यापेक्षां साक्षात् धर्म करण्यांत अधिक सद्गुण आहे, हें खरें आहे. परंतु, त्या दुसऱ्या पर्यायांत एकप्रकारचें भूषण आहे; नाहींसें नाहीं." तें ऐकून त्यास—

**सिर्वाद** ( बाई ).– अहो महाराज, देशांतील कांहीं मनुष्यांचे दुर्गुण सर्व लोकांच्या हितास कारणीभूत होतात, असें जें मांदिव्हिली[1]नामक ग्रंथकाराचें मत आहे, त्याचें तात्पर्य हेंच वाटतें.

**ज्ञान्मन.**— होय. पण तें मत सिद्ध करण्यांत त्या गृहस्थाकडून एक चूक झाली आहे. ती ही कीं, त्यानें आपल्या पुस्तकांत दुर्गुण आणि हित ह्यांच्या व्याख्या केल्या नाहींत. ज्या वस्तूंपासून सुख होतें, त्या सर्व वस्तु तो दुर्गुणांत गणितो. नीतीविषयीं त्याचें मत फार संकुचित आहे. सुख हाच एक दुर्गुण आहे, असें त्याला वाटतें; आणि तो समजतो कीं, संपत्ति हेंच सर्व प्रजेच्या सुखास कारण आहे; परंतु, ती गोष्ट खरी नव्हे. वस्तुतः पाहिलें असतां सुख हा कांहीं दुर्गुण नाहीं. पहा, बागेचा शोक असणें, हें एक

१ मांदिव्हिली हा एक डच वैद्य होता. तो इ० स० १८६० च्या सुमारें दोर्त येथें जन्मला होता. तो लंदन शहरांत येऊन राहिला होता. तेथें त्यानें कितीएक ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले. त्यांत "'मधुमक्षिकांची गोष्ट" हा ग्रंथ फार प्रख्यात आहे. त्यांत वर सांगितलेल्या मताचें प्रतिपादन केलें आहे.

प्रकारचें मोठें दुःख आहे; तथापि, तो अगदीं निरुपद्रव आहे, हें सर्वांस ठाऊक आहे. ह्या जगांत कितीएक प्रकारचीं सुखें साक्षात् दुर्गुण आहेत, हें खोटें नव्हे; पण त्यांपासून मनुष्याच्यानें दूर राहवत नाहीं. ह्मणजे, ह्या जगामध्यें सद्गुण आणि सुख ह्यांची संगति अखंड चालत नाहीं; ती स्वर्गलोकीं बरोबर चालेल, अशी आशा आहे. मांदिव्हिलीनें एका दारूबाजाचें उदाहरण घेतलें आहे; आणि तो ह्मणतो कीं, दारूबाज मनुष्य जो पैसा दारूंत उडवितो, तो देशांतील इतर लोकांच्या उपयोगीं पडतो. होय. ही गोष्ट खरी. परंतु, ह्या पैशानें, दारू करणारे, कलाल, इत्यादिकांचें जें कांहीं बरें होत असेल; त्याची तुलना, दारूबाज मनुष्याच्या कुटुंबाच्या दुःखांशीं करून पाहावी; ह्मणजे खरें कायतें तेव्हांच लक्षांत येईल. कोणतीही एकादी गोष्ट बरी किंवा वाईट, हें ओळखण्याचा हाच उत्तम मार्ग होय. ह्मणजे, ज्यापासून वाइटापेक्षां चांगलें अधिक उत्पन्न होतें, तें चांगलें; आणि ज्यापासून चांगल्यापेक्षां वाईट अधिक उत्पन्न होतें, तें वाईट. ह्याच नियमांस दुर्गुण लावून पाहावें. दुर्गुणांपासून चांगली गोष्ट उत्पन्न होते, असें कधीं कधीं घडतें खरें; तरी जरा सूक्ष्म विचार करून पाहिला असतां, ती गोष्ट प्रत्यक्ष दुर्गुणापासून झाली नाहीं, असें दिसून येतें. उदाहरण घ्या. एका चोरानें एका गृहस्थाचें द्रव्य चोरून, ज्यास त्याचा उपयोग विशेष चांगला करितां येत होता, त्यास दिलें. ह्यांत दुर्गुणापासून चांगली गोष्ट उत्पन्न झाली अशी दिसते मात्र. परंतु, ती भ्रांति आहे. हा जो चांगला परिणाम झाला, तो चोरी करण्याच्या दुर्गुणापासून झाला नाहीं; तर, तें द्रव्य

काळ एकाचे हातून काढून दुसऱ्याच्या हातीं दिल्यानें झाला आहे. मांदेव्हिल्लीचें पुस्तक मीं सुमारें चाळीस पन्नास वर्षांपूर्वीं वाचिलें. त्याचा मला कांहीं अचंबा वाटला नाहीं. तर, जगाच्या खऱ्या अंतर्गत रीतीचें मला विशेष ज्ञान झालें. तुह्मी कांहीं ह्मणा; मनुष्यांचें सर्व सुख त्यांच्या सद्गुणांवर असतें. स्पार्टा येथें सर्व लोकांचें मत असें झालें होतें कीं, चोरी करण्यास कांहीं हरकत नाहीं, मात्र ती बेमालूम करावी ह्मणजे झालें. ह्मणजे, चोरी करील तो दोषी नव्हे; तर चोरी करून तिची ज्यावर शाबिदी होईल, तो दोषी, आणि तो मूर्ख. ह्मणजे चोरी करणें हा तेथें अपराध मानीत नसत; ह्मणून चोरीपासून लोकांस ताप झाल्यावांचून राहात असे काय. ? तेथें सुरक्षित असें कांहींच कोणास वाटेना. आणि जेथें संरक्षण नाहीं, तेथें मग सुख तें कोठचें असणार. ? सत्यावांचून लोकांत जूट अशी राहवयाची नाहीं; आणि व्यवहार चालावयाचा नाहीं. असें आहे, तरी सांप्रतच्या स्थितीमध्यें सुद्धां आपणाच्यानें एकदम कोणावर भरंवसा ठेववत नाहीं. तेव्हां ह्याच्या दसपट जर असत्य वाढलें, तर काय परिणाम होईल. ! एकमेकांशीं दळणवळण असल्यानें, आणि परस्परांची माहिती परस्परांस असल्यानें मनुष्यें एकत्र राहतात. सर थामस ब्रौन एकदा ह्मणाला होता कीं, "नरकांत टाकलेले महापातकी प्राणी असत्य भाषण करितात काय. ? नाहीं बरें. ! ते देखील असत्य भाषण करीत नाहींत. कशावरून ह्मणाल, तर, जर ते एकमेकांशीं खोटें बोलते, तर, नरक ह्मणून जी त्या सर्वांच्या वस्तीची एक जागा, ती राहिली नसती.!"

एके वेळीं गोष्टी चालल्या असतां जान्सन ह्मणाला,

"आपणाविषयीं आपण अगदीं केवळ शुद्ध आणि प्रतिष्ठित रीतीनें बोलावें, असें जर मनुष्याच्या मनांत असेल, तर त्यानें ज्या गोष्टी अगदीं निर्विवाद असतील तेवढ्याच सांगाव्या. ह्मणजे, मी रिचमंद येथें गेलों होतों, अथवा मी साहा फूट ऊंच आहें, असें जर खरें भाषण कोणी करील, तर, पहिली गोष्ट लोकांच्या प्रत्यक्ष साक्षीवरून खरी ठरेल, आणि दुसरीची प्रतीति तर तेव्हांच मोजमाप लावून पाहतां येईल. अशा गोष्टी मनुष्यानें खातरीनें सांगितल्या तरी चिंता नाहीं. परंतु, मी शाहणा आहें असें त्याच्यानें खातरीनें ह्मणवणार नाहीं, अथवा मजमध्यें अमुक गुण उत्तम आहे, असेंही सांगवणार नाहीं. बरें, आत्मनिंदा ह्मणाल, तर तोही एक आत्मस्तुतीचाच प्रकार आहे ह्मणजे, लोकांनीं मला किती वाईट ह्मटलें असतां चालेल, हें मनुष्याचें मत, आत्मनिंदेवरून स्पष्ट दिसून येतें. अशा प्रकारच्या आत्मनिंदेनें आत्मस्तुतीचा लाजिरवाणा दोष माथां येऊन, शिवाय, असत्य भाषणाचें पाप पदरीं घ्यावें लागतें." त्यावर बास्वेल्लानें उत्तर दिलें, "आपले दोष लोकांचे मनांत पूर्णपणें ठसल्याची खातरी झाल्यामुळें ही कदाचित् आत्मनिंदा करण्याविषयीं मनुष्याची प्रवृत्ति होण्याचा संभव आहे. कारण, लोकांनीं खालीं पाडण्यापेक्षां, आपण होऊनच आपण खालीं पडणें हें बरें, असें मनुष्यास सहज वाटतें." होय. पण, लोक मला खालीं पाडतील, असें मनुष्याच्या मनांत येणेंच आधीं मुष्कल आहे.

---

१ अशा प्रकारच्या म्हणण्याचें कारण एवढेंच कीं, 'पापोहं पापकर्माहं' इत्यादि जीं भाषणें आहेत, तीं ह्याप्रकारचीं नव्हत.

एके समयीं जान्सन ह्मणाला, ईस्तइंदीजमधील सर्व राष्ट्रें अगदीं रानटी आहेत. त्यावर,

**बास्वेल.**— पण चिनी लोक खेरीज करून ना.?

**जान्सन.**— नाहीं, नाहीं, ते सुद्धां.

**बास्वेल.**— त्यांच्यांत कलाकौशल्य नाहीं काय. ?

**जान्सन.**— होय. ते भांडीं तेवढीं करतात बुवा. !

**बास्वेल.**— त्यांच्यांत लिहिण्याची पद्धति आहे, ती कांहींच का नव्हे.?

**जान्सन.**— होय. पण त्यांच्यांत मूलाक्षरें *कोठें आहेत.? इतर सर्व राष्ट्रांनीं आपल्या सोईकरितां आपणांस मूळाक्षरें करून घेतलीं आहेत. हें काम कांहीं चिनी लोकांस करतां आलें नाहीं.

**बास्वेल.**— पण त्यांच्या लिपींत असंख्य मूलाक्षरें असल्यामुळें, त्यांच्या ग्रंथांत ज्ञानभांडारही मोठेंच आहे.

**जान्सन**— असेल. पण त्यांची लिपी जी इतकी कठीण ह्मणतात, ती केवळ त्यांच्या अडाणीपणामुळें कठीण झाली आहे, दुसरें कांहीं नाहीं. एकादा वृक्ष कुऱ्हाडीनें तोडण्यास जे श्रम लागतील, त्यांपेक्षां तो दगडानें तोडण्यास अधिक श्रम लागावयाचे नाहींत काय ?

जान्सन हा मनाचा मोकळा निरभिमानी, आणि वास्तविक उत्तम स्वभावाचा मनुष्य होता. तरी तो मनुष्य होता; ह्मणजे, त्याचें मन जरी एवढें थोर होतें, तरी, प्रसं-

---

* चिनी भाषेंत मूळाक्षरें नाहींत. प्रत्येक प्रकारची वस्तु आणि प्रत्येक प्रकारची क्रिया प्रदर्शित करण्यास कांहीं नियमित चिन्हें आहेत. तेव्हां जितक्या वस्तु आणि जितक्या क्रिया तितकीं त्यांच्या लिपीचीं मूळाक्षरेंच म्हणावयाचीं!

गोपाल्त ह्याची वृत्ति फार विलक्षण होत असे. तो 'कविच-रित्र' ह्या नांवाचें पुस्तक लिहिण्याच्या विचारांत होता. आणि लार्ड मार्चमोंत नामक मुत्सद्यास पोप कवीची पुष्कळ माहिती होती. परंतु त्याचा आणि जान्सनाचा परिचय नव्हता. ह्मणून बास्वेल आपण होऊन त्या सरदारास जाऊन भेटला, आणि त्यास ह्मणाला कीं, पोप कवीविषयींची माहिती आपण कृपा करून जान्सनास द्याल, तर मी आपला फार आभारी होईन. लॉर्ड मार्चमोंत ह्यानें उत्तर दिलें कीं, ठीक आहे, जान्सन फार मोठा मनुष्य आहे, त्याला मी त्याचे घरीं जाऊन उद्यां एक वाजतां भेटेन, आणि मला काय माहीत आहे तें मी त्याली सांगेन; हा माझा निरोप तुह्मी त्यास कळवा. आपल्या सन्मान्य मित्राच्या कामासाठीं आपण अप्रार्थित केलेली खटपट इतकी सफळ झाली हें पाहून, बास्वेलास मोठा संतोष झाला. आणि मोठ्या लगबगीनें आणि आनंदानें ती हकीकत त्यास कळविण्यास तो त्याजकडे गेला. त्यानें झालेलें सर्व वर्तमान जान्सनास सांगितलें. त्याच्या योगानें जान्सन खूष व्हावयाचा तो एकीकडेस राहून फार क्रोधायमान झाला, आणि मोठ्यांनीं ओरडून बास्वेलास ह्मणाला, "उद्यां मी मुळीं शहरांत राहावयाचा सुद्धां नाहीं, मग भेटणें कोठचें.? मला पोप कवीच्या माहितीची जरूर नाहीं." तें ऐकून, थ्रेल बाई जवळ होती ती त्यास बोलली, "अहो, आपण कविचरित्र लिहिणार आहां, आणि आपणांस पोप कवीच्या माहितीची गरज आहे, असें समजून बास्वेलानें एवढी खटपट केली. एऱ्हवीं त्याचें काय अडलें होतें.?" जान्सन ह्मणाला, "काय.? मला गरज.? मुळींच नाहीं.!

ज्ञानाची वृष्टि झाली, तर पुढें हात करून तें मी झेलीन.! मी त्यासाठीं इतका त्रास भोगीत फिरणार नाहीं.!" पहा.! आतां ह्या वृत्तीस काय ह्मणावें बरें.!

एके दिवशीं लार्ड ग्राहाम हा सरदार एका गृहस्थाची फार स्तुति करून ह्मणाला कीं, तो लोकांच्या स्वतंत्रतेविषयीं फार झटणारा आहे. तें ऐकून जान्सन जरा हंसून त्यास बोलला कीं, "महाराज, तो गृहस्थ तरुण आहे. तरुण मनुष्यांस अशीच स्वतंत्रतेची मोठी आवड असते; पण ती कोठपर्यंत.? आपणांस वाटतें त्याप्रमाणें आपले सर्व कारभार स्वतंत्रपणें करण्यास आपण खरोखर स्वतंत्र नाहीं, अशी त्यांची खातरी होईपर्यंत.! स्वतःच्या स्वतंत्रतेविषयीं बहुधा सर्वांची एकवाक्यता असते. ह्मणजें, ती जितकी आपणास मिळवितां येईल, तितकी आपण मिळवावी, असें प्रत्येक मनुष्यास वाटत असतें. पण इतरांच्या स्वतंत्रतेविषयीं ती गोष्ट आपणास कबूल नसते. कारण, ज्या मानानें आपण अधिकाधिक स्वतंत्रता घेतों, त्या मानानें ती इतरांची कमी झाली पाहिजे. देशांतल्या बकाली लोकांनीं स्वतंत्र होऊन सर्व राज्याचा कारभार चालवावा, असें आपल्या मनांत कधींही येत नाहीं." तें ऐकून रमसे ह्मणून एक गृहस्थ जवळ बसला होता तो ह्मणाला, "हो, तुह्मी काहीं ह्मणा; परंतु, घोंटाळ्यापेक्षां व्यवस्था चांगली, हें खचीत आहे." त्यावर जान्सनानें उत्तर केलें, "होय. घोंटाळ्यापेक्षां व्यवस्था चांगली आहे हें खचीत; पण, श्रेष्ठ आणि कनिष्ठ असा भेद असल्यावांचून व्यवस्था राहावयाची नाहीं."

स्त्रीपुरुषांच्या व्यभिचाराविषयीं गोष्टी निघाल्या असतां बास्वेलानें सांगितलें कीं; माझ्या एका मित्राचें आणि त्या-

च्या बायकोचें ह्याविषयीं बोलणें चाललें असतां माझ्या मित्राचें मत असें पडलें कीं, स्त्रियांचा व्यभिचार जितका दोषास्पद आहे, तितका पुरुषांचा नाहीं, असें वाटतें. जान्सनानें तें ऐकून उत्तर दिलें कीं, "तुमच्या मित्राचें ह्मणणें अगदीं बरोबर आहे. अहो, पुरुष आणि परमेश्वर ह्यांच्या संबंधाची जी गोष्ट आहे, ती वेगळी आहे; ती तूर्त एके बाजूस असो. परंतु नवरा आणि बायको ह्यांच्या संबंधानें पाहिलें असतां, नवऱ्यानें बायकोशीं इमानेंइतबारें वागणें ह्मणजे परद्वार न करणें, ह्याला कांहींच अर्थ नाहीं. कारण, त्यांचा संबंध मुलांबाळांपुरता आणि देशरीतीपुरता दैवगत्या बनलेला असतो. शाहण्या ज्या विवाहित स्त्रिया असतात, त्या आपल्या नवऱ्यांच्या एकपत्निव्रताविषयीं इतकी परवा बाळगीत नाहींत." बास्वेल ह्मणाला, "तथापि स्त्रियांचें पातिव्रत्य आणि पुरुषांचें एकपत्नीव्रत ह्यांत अंतर तर खरेंच." त्यावर जान्सनानें उत्तर केलें, "अंतर ह्मणजे हो.! महदंतर.!! पहा. पुरुषाच्या व्यभिचारानें त्याच्या पत्नीस भलतीच्याच मुलास पुत्र ह्मणणें प्राप्त होत नाहीं; परंतु, स्त्रीच्या व्यभिचारानें पुरुषास भलत्याच्याच मुलास पुत्र ह्मणणें भाग पडतें.!!"

हा लेख बराच लांबला. ह्मणून आतां हा पुरा करितों.

---

## भाग चवथा.

गोल्डस्मिथ ग्रंथकाराविषयीं जान्सन एकदा असें ह्मणाला कीं, "हातांत लेखणी नसली ह्मणजे त्याचेसारखा मूर्ख कोणी नाहीं; आणि हातांत लेखणी घेतली ह्मणजे त्याचेइतका शाहणा कोणी नाहीं."

वास्वेल एके वेळीं जान्सनास ह्मणाला कीं, "आपणांस एकादी मोठी नौकरी असती तर बरें होतें; आणखी आपणांस पेन्शन आहे तेंही अगदीं थोडें आहे." त्यावर जान्सनानें उत्तर केलें, "ह्याविषयीं मी कोणालाही दोष लावीत नाहीं; आणि ह्याबद्दल इतरांस दोष लावावा, हें योग्यही नाहीं; मला हें जे मिळालें आहे, ह्याचेंच मला मोठें नवल वाटतें. साधारण प्रचाराचा विचार करून पाहिला असतां, मला जें पेन्शन दिलें आहे, तें वाजवीपेक्षां फाजील आहे, असें मला वाटतें. अहो, हा गृहस्थ कसला.? सरकारचा मित्र ना स्तुतिपाठक.! आर्जव न करितां मिळालें तें मिळालें.! मीं वडे लोकांची कधीं हांजी हांजी केली नाहीं. त्यांनीं मला बोलावणीं पाठविलीं, तरी मी त्यांजकडे गेलों नाहीं. ह्मणून त्यांनींही तो नाद आतां सोडून दिला आहे. त्यांची पक्की खातरी झाली आहे; आणि त्यांस मी पुरा माहीत झालों आहें." तें ऐकून वास्वेल बोलला, "हूं मला खरें सुद्धां वाटत नाहीं. कारण, आपलें भाषण ऐकून ते खचीत खूष झाले असते." जान्सन ह्मणाला, "छिः! ही अगदीं खोटी गोष्ट.! अहो, वड्या लोकांस आणि वड्या लोकांच्या बायकांस, त्यांचें कोणीं खंडन केलें तर तें आवडत नाहीं." ही गोष्ट खरी आहे. वास्वेल बोलला, "मला आपल्या भाषणानें नेहमीं अत्यंत संतोष होतो." जान्सन ह्मणाला, "होय. पण तुह्मी जर मोठे एकादे मुत्सद्दी असतां, तर तुह्मांला इतका संतोष खचीत झाला नसता; मग तर तुह्मी आपल्या योग्यतेच्या घमंडींत असतां.!"

एके समयीं सज्जनपणावरून बोलणें चाललें असतां, वास्वेल जान्सनास ह्मणाला, "महाराज, आपण महातत्त्व-

वेत्ते, माझे परम मित्र आणि मला सन्मार्ग दाखविणारे अहां." त्यावर जान्सनानें उत्तर दिलें, "मी चांगला मनुष्य आहे, ह्याचा मला फार संतोष वाटतो. मी आतां चांगला मनुष्य आहें. ह्मणजे इतकेंच कीं, मी परमेश्वरास भितों, राजाचा सन्मान राखितों, कोणाचें वाईट व्हावें असें मनांत आणीत नाहीं, आणि मनुष्यमात्राचें बरें करण्यास झटतों." साधूंचीं लक्षणें हींच होत.

बास्वेल एकदा सहज बोलला कीं, "घर फोडणारा जो चोर असतो, तो बहुतकरून अतिशयित भितरा असतो." जान्सन ह्मणाला, "अहो, ठीकच आहे. घरांत असतो, तेव्हां त्यास एकाएकीं गोळी लागून मरण्याचें भय वाटतें; आणि बाहेर पडला ह्मणजे त्याला फांसाची भीति प्राप्त होते.!"

तारीख ३० आगष्ट, सन १७७२, रोजीं प्रातःकाळीं बास्वेलाचा बाप मरण पावला. तें वर्तमान त्यानें लागलेंच जान्सनास सांगितलें. तें ऐकून त्याला फार वाईट वाटलें. पुढें कांहीं दिवसांनीं त्यानें बास्वेलास एक पत्र लिहिलें. त्याचें तात्पर्य असें.—

"प्रिय मित्रा,

**विनंती विशेष.**—तुझे तीर्थरूप वारले, ही गोष्ट फार वाईट खरी. तथापि तुझ्या दुःखाला विरजण पाडण्यासारख्या कांहीं गोष्टी विचारपात्र आहेत. पहा. ते अगदीं वृद्ध झाले होते, आणि मरण केव्हां येईल कोण जाणे; असें त्यांस वाटत होतें. ते मोठे धार्मिक असत. आणि आलीकडे कितीएक वर्षेपर्यंत तर त्यांचें मन अगदीं परलोकाकडे लागलें होतें. ते विचारी नव्हते, असें तुझे मनांत येऊन

तुला कदाचित् वाईट वाटेल. त्यांची तुजवर ममता होती, ह्यांत तर संशय नाहीं; परंतु, ते तुझे लाड करीत नसत, हेंही कबूल करणें भाग आहे. साधारण प्रीति संपादणें हें कांहीं अंशीं मनुष्याच्या स्वाधीन असतें; परंतु, लाड पुरवी इतका ळळा लावणें, हें हातचें नाहीं. आणि उपेक्षेमुळें अथवा असमंजसपणामुळें जर त्यांच्या मनांत तुजविषयींचा ळळा नाहींसा झाला असता, तर तो आपोआप त्यांचेठायीं पुनः जागृत करणें, हें त्यांच्या स्वाधीनचें नव्हतें. तेव्हां, एकमेकांच्या दोषांबद्दल तुह्मीं परस्परांस क्षमा करावी, आणि एकमेकांचें हित चिंतावें, एवढेंच कायतें राहिलें आहे.

त्यांनीं आपल्या जिनगीची शेवटची व्यवस्था कशी करून ठेविली आहे, हें मला कळावें, अशी माझी फार इच्छा आहे.

तुला आतां नवी स्थिति प्राप्त झाली आहे; त्यामुळें तुझ्या मागें नवे वेध लागून तुला आतां नवीं कामें करावीं लागणार आहेत. कौली ह्मणून एक कवि होता, त्यानें असें ह्मटलें आहे कीं, संसार हा उत्तम प्रकारच्या व्यवस्थित काव्यासारखा आहे. अशा प्रकारच्या काव्याविषयीं एक मुख्य नियम असा आहे कीं, त्याची प्रस्तावना अगदीं साधी असून, तिच्या अवलोकनानें, वाचणाऱ्यास, पुढील काव्यांत कांहीं विलक्षण रसमाधुर्य सांपडेल, असें वाटूं नये. त्याप्रमाणें तूं आपल्या संसाराचा आरंभ असा कर कीं, त्यांत डौल अगदीं नसून, खर्चाचें मान होईल तितकें कमी ठेव. डौल आणि खर्च हे पाहिजेत तेव्हां पाहिजेत तितके वाढवितां येतात; पण ते कमी करण्यास मोठी अडचण पडते. हल्लीं तुजपाशीं जी जिनगी आहे, ती केवळ तुझीच

आहे, असें समजूं नको; कारण, कदाचित्, एकादा धनको असा उभा राहील कीं, त्याचें ऋण तुझ्यानें फेडवणार सुद्धां नाहीं. ह्मणून, पहिल्यापासूनच सावध राहून खर्च वेताचा ठेव. तूं आपणावर कोणाचें ऋण राहूं देऊं नको. हें काम पहिल्यानें कर.

परमार्थाकडे लक्ष दिलें ह्मणजे असें वाटतें कीं, संसारांत वागण्याच्या ज्या पद्धति आज कित्येक पिढ्यांपर्यंत चालत आल्या आहेत, व ज्या गोष्टी शहाणपणाच्या ह्मणून वंशपरंपरेनें आपण खऱ्या मानीत आलों आहोंत, त्या सर्व व्यर्थ होत. परंतु, थोडा सूक्ष्म विचार कर. ह्मणजे, दारिद्र्याच्या योगानें किती दुःख होतें, किती पाप होतें, परोपकारास किती विघ्नें येतात, आणि सद्गुणाचरणास किती संकोच होतो, हें तुला सहज समजून येईल. आणि मग, परलोकच्या अनंतकाल सुखाच्या संपादनार्थ, इहलोकच्या गोष्टींकडे किती लक्ष पुरविलें पाहिजे, ह्याविषयीं अंतःकरणांत चांगला उजेड पडेल.

जुन्या चाकर लोकांवर लोभ कर. आपल्या गुमास्त्यांची आणि कारखानदारांची प्रीति संपाद. त्यांस कठोर भाषणानें, रिकाम्या डौलानें, अथवा उघड संशय घेऊन त्रास देऊं नको.— लोभ असावा हे विनंती.

तुझा मित्र,

**साम्, जान्सन.**"

हें पत्र किती सरळ आणि बोधपर आहे पहा.! खरोखर, जान्सनाची बुद्धि विशाळ होती, आणि त्याला परहितेच्छा फार होती.!

संभाषण करण्याविषयीं एके वेळीं गोष्टी निघाल्या अस-

तां जान्सन ह्मणाला, "चांगलें भाषण करतां येण्यास ज्ञान पाहिजे;—ह्मणजे,—विषयांची माहिती पाहिजे, ही पहिली गोष्ट; भाषा इतकी येत असावी कीं जें मनांत येईल तें विनचूक स्पष्ट करतां यावें, ही दुसरी गोष्ट; योजना पाहिजे,—ह्मणजे,—गोष्टी सांगावयाच्या त्या अशा रीतीनें सांगतां याव्या कीं, ती रीति फार कोणाच्या पाहण्यांत आलेली नसावी, ही तिसरी गोष्ट; समयसूचकता ही चवथी गोष्ट; आणि सर्वांत मोठी व मुख्य गोष्ट ही पाहिजे कीं, कितीही वेळा जरी आपला प्रयत्न व्यर्थ गेला, तरी यश येईपर्यंत प्रयत्न करावयाचा, अशाविषयीं दृढ निश्चय असावा." होय. इतक्या गोष्टी असल्यावर मनुष्याचें भाषण खचीत मनोरम होईल.

बास्वेल आणि कोणीएक स्त्री एका मनुष्याच्या गुणांवगुणांविषयीं त्याच्या समक्ष बोलत असतां, जान्सन ह्मणाला, "पुरे आतां. उगाच कोणाचे गुणदोष त्याच्या समक्ष बाहेर काढणें बरोबर नाहीं. जनाच्या नांवानें हाका मारणें हे योग्य नाहीं. आंगांत सद्गुण असून त्याजकडे कोणीं पाहिलें नाहीं, असें जनांत कधीं घडत नाहीं. सद्गुणी मनुष्याचीही उपेक्षा कधीं कधीं होते, पण त्यास कारण त्याचा कांहीं तरी दुर्गुण असतो." त्यावर बास्वेल बोलला, "अहो महाराज, सांप्रत काळीं कितीएक उत्तम वकीलांस सुद्धां काम मिळत नाहीं, हे आपणांस विदित आहेच." जान्सनानें उत्तर दिलें. "अहो काम मिळण्यास लौकीक पाहिजे. लौकिकावांचून काम मिळत नाहीं. वकील चांगला असून जर त्यास काम मिळत नाहीं, तर तो परिणाम त्याच्या कांहीं तरी दुर्गुणाचा होय. कारण, तो चांगला आहे असें सर्वांस माहीत असल्यावर लोक त्याज-

कडे काम दिल्यावांचून राहणारच नाहींत. अशा मनुष्याची जनानें उगाच उपेक्षा केली, असें ह्मणणें योग्य नव्हे; आणि अशाची उपेक्षा कधीं व्हावयाचीही नाहीं. उत्तम घोडा विकण्याकरितां बाजारांत आणिला आणि जर तो न विके, तर ही गोष्ट सद्गुणांच्या उपेक्षेमुळें झाली असें समजूं नये, तर सद्गुणांविषयींच्या अज्ञानामुळें झाली, असें समजावें."

जान्सन आपल्या नौकरांवर व आपल्या जवळच्या प्राण्यांवर फार ममता करीत असे. मुलें ह्मणजे त्याला अगदीं जीव का प्राण वाटत. त्यांस तो मिठाई देऊन वारंवार खूष करी. त्याचें एक मांजर होतें, त्याचें नांव त्यानें हाड्ज असें ठेविलें होतें. तें त्याचें फार लाडकें असे. तें इतकें कीं, त्याजकरितां बाजारांतून जें सामान आणावयाचें असे, तें, तो आपल्या नौकरांकडून न आणवितां, खुद आपण जाऊन आणी. ह्यांतला आशय एवढाच कीं, त्याच्या कामास त्रासून त्यांनीं त्याजवर दांत ओंठ खाऊं नयेत, आाणि त्याचा द्वेष करूं नये. एके दिवशीं तें मांजर जान्सनाच्या आंगावर चढून त्याच्या छातीपर्यंत गेलें. जान्सन त्याच्या आंगावरून आणि शेंपटावरून हात फिरवीत होता, आणि आनंदानें गोष्टी बोलत होता. तेव्हां बास्वेल त्यास ह्मणाला, "अहो, हें आपलें मांजर फार चांगलें आहे." जान्सनानें उत्तर केलें, "हो हेंच काय, पण मजपाशीं जीं पूर्वी मांजरें होतीं, तीं मला ह्याहून देखील अधिक आवडत असत." इतकें ह्मणून गेल्यावर त्यानें हातांतल्या मांजराच्या तोंडाकडे पाहिलें, तेव्हां त्याच्या चर्येवरून त्याला वाटलें कीं, आपण जें बोललों तें ह्या गरी-

वाच्या जीवास लागलें, हें ठीक नाहीं; ह्मणून त्यानें पुनः चुकल्यासारखें करून ह्मटलें, "हो, पण हें देखील मांजर फारच चांगलें आहे बरें का! खरोखरच चांगलें आहे.!" पहा अंतःकरणाचें कोंवळेपण किती आहे तें.!!

पूर्वीं एकदा बास्वेल आणि जान्सन हे दोघे हिब्रिदीज येथें प्रवासास गेले होते. त्याच्या गोष्टी निघाल्या होत्या, त्या वेळीं जान्सन ह्मणाला. "त्या प्रवासापासून मला नाना-प्रकारच्या अनेक कल्पना सुचल्या; इतक्या कल्पना मला पूर्वीं कशापासून कधींही सुचल्या नव्हत्या. आणखी, मनुष्याच्या राहण्याची एक नवीच विलक्षण रीति मला पाहावयास सांपडली." तें तेकून—

**बास्वेल.**— तोच प्रवास पुनः एकदा करण्यास तुह्मांला नाहीं का आवडणार.?

**जान्सन.**— नाहीं. तोच प्रवास पुनः मला नको. अहो तो आतां शिळा झाला.! त्यांत काय अर्थ.! ग्राव्हिना ह्मणून एक इतालियन ग्रंथकार होऊन गेला; तो असें ह्मणत असे कीं, मनुष्य जें वाचितो, तें दृष्टीनें पाहण्याची त्यास इच्छा होते; परंतु, जें पाहातो, त्याचें वर्णन वाचण्यास कोणाही मनुष्यास आवडत नाहीं. प्रत्यक्ष पाहणें आणि वर्णन वाचणें ह्यांमध्यें इतकें अंतर आहे. वर्णनाच्या योगानें, ती वस्तु पाहण्याविषयीं इच्छा उत्पन्न होते; आणि वस्तु दृष्टीस पडली ह्मणजे ती तृप्त होते. पाहिजे असल्यास इतर लोकांनीं जाऊन हिब्रिदीज पाहावें.

**बास्वेल.**— जे देश कधीं पूर्वीं पाहिले नाहींत, ते एकदा जाऊन पाहावे, अशी मला फार इच्छा होते. मनांत येतें कीं, तुर्कस्थान पाहावें. तेथें, धर्मादि सर्व गोष्टी,

आपण पाहिल्या आहेत त्यांहून अगदीं भिन्न आढळतील.

**जान्सन.**— विचार करण्यासारख्या आणि शोधपात्र अशा मुख्य दोन गोष्टी आहेत; एक ख्रिस्ती धर्म, आणि दुसरा मुसलमानी धर्म. तेथच्या इतर सर्व गोष्टी अडाणीपणाच्या आहेत, असें ह्मटलें तरी चालेल.

लंदनांतील लोकसंख्येविषयीं एकदा गोष्टी निघाल्या तेव्हां जान्सन ह्मणाला, "अहो, मृत्यूंच्या तक्त्यांवरून उघड दिसून येतें कीं, लोक पूर्वींपेक्षां अधिक मरत नाहींत; तेव्हां, लोकसंख्या आहे तीच आहे, वाढली नाहीं, हें उघड आहे."

**बास्वेल.**— मला वाटतें कीं, लंदनांत जन्मलेल्या मुलांतलीं पुष्कळ मुलें अगदीं लहानपणीं मरतात.

**जान्सन**— होय, खरें आहे.

**बास्वेल.**— पण जीं जगतात तीं अशीं सुदृढ आणि अशीं बळकट असतात कीं काय सांगूं! डाक्तर प्रैस ह्मणतो कीं, तीं अशीं असतात ह्मणूनच जगतात.!

**जान्सन**— होय. तें खरें आहे. एक मोठा प्रवासी एके ठिकाणीं असें लिहितो कीं, इंदियन लोकांत अशक्त अथवा व्यंग माणसें बहुधा नसतात; ह्याचें कारण तो असें सांगतो कीं, त्या लोकांस आपला चरितार्थ शिकार करून अथवा मासे धरून करावा लागतो; हीं कामें अतिशयित श्रमांचीं आणि कष्टांचीं आहेत. त्यांच्या सपाट्याखालीं अशक्त आणि व्यंग मुलें बहुधा टिकत नाहींत, मरून जातात. जर मी इंदियन कुळांत जन्मलों असतों, तर खचीत लहानपणींच मेलों असतों. माझे डोळे मला भक्ष्य मिळविण्याच्या कामीं उपयोगीं पडतेना. मला आतां मासे धर-

तां येतात. पण जर मी इंदियन असतों, तर उपाशीं मेलों असतों; अथवा मला कांहीं करतां येत नाहीं, असें पाहून त्यांनीं मला मारून टाकिलें असतें.

**बास्वेल.**— पण, त्यांना वक्तृत्वाची फार आवड आहे असें सांगतात; आणि तुह्मांला चांगलें बोलतां येतें; ह्मणून त्यांनीं तुह्मांला कदाचित् संभाळून ठेविलें असतें.

**जान्सन.**— पण, मला बोलतां येईपर्यंत त्यांनीं राहूं दिलें असतें तर.! त्यांच्यांत मी दाहा वर्षांचा होण्यापूर्वींच मरावयाचा.! हें पक्कें लक्षांत ठेवा कीं, इंदियनाला भूक लागली, आणि त्याचें नऊ वर्षांचें मूल जर आपला निर्वाह चालविण्यास समर्थ नसलें, तर त्यास तो मध्यें टाकून देऊन पुढें चालता होईल, बरोबर न्यावयाचा नाहीं. त्यांना माया नाहीं.

**बास्वेल.**— तर मग, आईबापांच्या ठायीं मुलांविषयीं स्वाभाविक ममता ह्मणून जी आपण समजतों, ती फार थोडी असते वाटतें.

**जान्सन.**— अहो, स्वाभाविक ममता ह्मणजे कांहीं नाहीं. परंतु, सकाम ममता, अथवा स्वकर्तव्यकर्मजन्य ममता जी आहे, ती कधीं कधीं चमत्कार वाटण्यासारखी अतिशयित असते.

**लो०**— (ह्मणून एक गृहस्थ जवळ होता, तो )—अहो, असें कां ह्मणतां.? यःकश्चित् कोंबडी, ती देखील आपलें पोट एकीकडे ठेवून आधीं आपले पिलांस दाणा घालिते.

**जान्सन.**— पण, असें करते तेव्हां कोंबडी स्वतः भुकावलेली असते असें कशावरून.? ती स्वतः भुकेलेली असूंद्या, तिचीं पिलें भुकेलेलीं असूंद्या, आणि तिला धा-

न्याचे दाणे सांपडूंद्या, ती, पोरांस देण्याचें एकीकडे ठेवून आर्धी आपण खाईल, हें मी खचीत खातरीनें सांगतों. कदाचित् एकादा कोंवडा आपण न खातां मिळालेले दाणे कोंवडीस खाऊं घालील. पण अशा वेळीं तो स्वत: क्षुधित असेल कीं काय हा मोठा संशय आहे.

**बास्वेल.**— होय. तें खरें. पण त्यास कारण ममता नव्हे; तर, त्यास कारण काम होय.—तथापि, इंदियन लोकांस त्यांच्या मुलांची थोडी तरी ममता असते, ह्यांत शंका नाहीं.

**जान्सन.**— ते आपल्या कितीएक मुलांचा सांभाळ करितात, हें उघड आहे. अहो, असें जर नसतें; तर त्यांच्यांतलीं मुलें मुळींच जगतीं ना.

मनुष्याच्या सदाचरणवृत्तीवर जान्सनाचा अगदीं भरंवसा नव्हता. एके समयीं गोष्टी चालल्या असतां—त्यास बास्वेलानें विचारिलें, "उत्तम मनुष्य कोणता? जो स्वभावत:च परम नीतिमान् आहे तो, अथवा ज्यानें आपल्या सर्व दुर्वासना आंवरून आपलें मन आपल्या स्वाधीन करून घेतलें आहे तो.?" जान्सनानें उत्तर दिलें, "अहो, ज्यानें आपल्या सर्व दुर्वासनांवर जय मिळविला आहे, तो वस्तुत: धन्य होय; त्याचें सामर्थ्य मोठें ह्यांत संशय नाहीं. तथापि, तो ह्मणजे उत्तम आहे, असें ह्मणतां येत नाहीं. दोन मनुष्य आहेत; एकाला मुळींच हात नाहींत; आणि दुसरा अत्यंत प्रामाणिक आहे; अशा स्थितींत मला द्रव्य ठेवावयाचें झालें, तर मी, ज्याला हात नाहींत, ह्मणजे ज्याला चोरण्याचें साधन नाहीं, त्याजपाशीं ठेवीन; अत्यंत प्रामाणिक मनुष्यापाशीं ठेवणार नाहीं."

एके वेळीं सहज बोलतां बोलतां तो ह्मणाला, "धरवेल तितकी हिंमत धरा; खर्च, जमेपेक्षां कमी करा; दरसाल थोडेंसें तरी द्रव्य शिल्केंत टाका; खरचितां त्यापेक्षां अधिक मिळवा; ह्मणजे तुह्मांला कधीं विपत्ति यावयाची नाहीं."

मृत्यूच्या भीतीविषयीं गोष्टी चालल्या असतां जान्सन ह्मणाला, "कितीएक लोकांस असें वाटत असतें कीं, आपण पवित्र आहों, आणि परमेश्वराच्या निर्विवाद सिद्धान्तानुरूप आपणांस खचीत मोक्ष प्राप्त होईल; ह्मणून त्यांस मृत्यूचें भय वाटत नाहीं. परंतु, इतरांस असें वाटत असतें कीं, आपण अमुक नियमित रीतीनें वर्तलों, तरच मोक्ष प्राप्त होईल, एरव्हीं व्हावयाचा नाहीं; आणि त्या रीतीनें आपणांकडून वर्तन होत नाहीं, असें त्यांचें मनच त्यांस सांगत असतें; तेणेंकरून त्यांस मृत्यूचें फार भय वाटतें. हेंच मत खरें आणि विचाराचें आहे."

नेहमीं खरेंच बोलावें, किंवा प्रसंगवशात् खोटें बोललें तरी चालेल, अशाविषयीं वादविवाद चालला असतां जान्सन ह्मणाला, "सत्य कधींही सोडूं नये, हा सामान्य नियम होय; कारण, त्याच्या योगानें मनुष्यांस एकमेकांविषयीं विश्वास आणि भरंवसा उत्पन्न होऊन, तेणेंकरून सर्वांची सोय व्हावी, आणि सर्वांचें सुख वाढावें, हें इष्ट होय. ह्या सोईचा आणि ह्या सुखाचा उपभोग आपणांस निरंतर मिळावा, ह्यास्तव, सत्य भाषणापासून उत्पन्न होणाऱ्या गैरसोई आणि दुःखें हीं ही निमूटपणें सोसणें योग्य होय. तथापि, ह्यास कांहीं अपवाद आहेत. उदाहरण पहा. कोणी मारेकरी हातांत तरवार घेऊन आला, आणि अमुक गृहस्थ कोणत्या वाटेनें गेला, असें आपणांस

विचारूं लागला, तर त्याशीं, खरें नाहीं तें बोलण्यास कांहीं चिंता नाहीं; कारण, मनुष्याचें होईल तितकें संरक्षण करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे." कितीएक धर्मशास्त्रांचें मत असेंच आहे. ख्रिस्ती शास्त्राचें मत असें नाहीं; कांहीं झालें तरी जें खरें तेंच सांगितलें पाहिजे, अशी त्याची आज्ञा आहे, असें कितीएक ख्रिस्ती मित्रांच्या तोंडांतून आह्मीं ऐकिलें होतें.

रानटी लोकांविषयीं बोलणें चालतां चालतां—

**बास्वेल.**— ओताहिती येथील लोकांस रानटी ह्मणणें बरोबर नाहीं.

**जान्सन.**— रानटी लोकांच्या वर्तीनें उगीच बडबड करूं नये.

**बास्वेल.**— कां बरें? त्या लोकांस नौकाशास्त्र माहीत आहे.

**जान्सन.**— कुत्र्या मांजरांना देखील पोहतां येतें.

**बास्वेल.**— ते खोदण्याचें काम चांगलें करतात.

**जान्सन.**— मांजर नाहीं का नखांनीं ओरबाडीत; अथवा मुलें नाहींत का खिळ्यांनीं रेघोट्या ओढीत.!

कसें तरी खंडन करावयाचें, असा जो कितीएक पुरुषांचा स्वभाव असतो, तशांतला हा जान्सनाचा मासला आहे, असें बास्वेलाचें मत दिसतें.

एके दिवशीं एक चघळ न्यायाधीश आपल्या कामाची लांबच लांब गांथण जान्सनास सांगत बसला होता. ती संपेल केव्हां, असें त्याला झालें होतें. पण ती अधिका-

धिकच लांबत चालली, तेव्हां जान्सन अगदीं कंटाळला, आणि आतां पुढें कांहीं बोलणार इतक्यांत आपली गोष्ट संपविलीशी करून तो न्यायाधीश ह्मणाला, "आणि मग मीं त्या चौघांस काळे पाण्याची शिक्षा दिली." तें ऐकिल्याबरोबर जान्सन ह्मणाला, "अहो, मी खरेंच सांगतों; त्यांजबरोबर मी जर पांचवा असतों तर फार चांगलें झालें असतें.! ह्या किटकिटींपासून सुटलों असतों एकदा.!" पहा, त्यांतलें त्यांत कसें मर्मभेदक उत्तर आहे तें.!

जान्सनाची भूतदया कांहीं लोकोत्तर होती. हें स्पष्ट दाखविण्यास त्याची एक गोष्ट बस आहे, असें वाटतें. एके दिवशीं रात्रीं फार उशीरानें जान्सन आपले घरीं येत असतां, अगदीं थकलेली, आणि फार कण्हत रस्त्यावर पडलेली अशी एक स्त्री त्याला आढळली. तिला पाहून त्याला फार दया आली, आणि तिला साह्य करावें, अशी त्यास इच्छा उत्पन्न झाली. तेव्हां त्यानें तिला उचलून आपल्या पाठीं गळीस घेतलें, आणि आपल्या घरीं आणिलें. आणि पाहतो तों ती अत्यंत दुराचारी आणि मूर्ख बायको आहे, असें त्याला समजलें. तरी त्यानें तिची उपेक्षा केली नाहीं. पदरच्या खर्चानें त्यानें तिला खाऊं पिऊं घातलें, औषध पाणी दिलें, बरें केलें, आणि सुबोध करून तिला सन्मार्गीं लावण्याचा प्रयत्न केला. ही भूतदया आणि हें औदार्य खचीत अप्रतिम होय.

जान्सनास ७५ वें वर्ष लागलें. आणि पुढें तो जो आजारी पडला, तो बरा झाला नाहीं. तो आधीं धार्मिक होता, आणि त्यास मृत्यूचें फार भय वाटत असे, तेणेंक-

रून,,
कचे विचार ५...
असें त्यास वाटे, त७८
करणानें आपल्या मित्रांशीं बोलत
नाल्द ह्मणून त्याचा एक मित्र होता,
"मीं तुह्मांपासून तीनशें रुपये घेतले आहेत,
त करण्यास मला सामर्थ्य नाहीं, त्याविषयीं
करा; धर्मशास्त्र वाचीत जा; आणि रविवारीं कांहीं
काम करूं नका; एवढ्या तीन गोष्टींचें देणें मला द..
सर जोशिया ह्मणाला, "बरें आहे. दिलें."

जान्सनाचा अंतकाळ समीप आला. दुखणें असाध्य झालें, असें वैद्यानें सांगितलें. तेव्हांपासून जान्सनानें अन्नपाणी अगदीं बेतानें घेण्याचा क्रम ठेविला. मृत्यूविषयींचीं त्याचीं सर्व भयें पळालीं. त्याचें मन शांत होऊन परलोकाकडे लागलें. त्यानें स्वस्थ चित्तानें आपल्या इष्टमित्रांचा निरोप घेतला, एकाग्र अंतःकरणानें परमेश्वराची प्रार्थना केली, आणि प्राण सोडिला. अशाप्रकारीं, इ० स० १७८४ च्या दिसेंबर महिन्याच्या १३ व्या तारखेस साम्युअल जान्सन मरण पावला.

हा पुरुष किती विद्वान्, किती बुद्धिवान्, आणि किती सदय होता, हें त्याच्या ह्या अल्प चरित्रावरून अल्पस्वल्प तरी दिसून येईल. त्यानें अनेक ग्रंथ लिहिले आहेत; ते सांप्रत पंडितमान्य आहेत. त्याची लिहिण्याची शैली चांगली होती. जो पक्ष हातीं घ्यावा, तो उत्तम रीतीनें स्थापित करावा, हें त्यास चांगलें साधत असे.